पश्चिम विदर्भातील सर्वाधिक खपाचे अग्रगण्य सायं दैनिक

# सिटी न्यूज सुपरफास्ट

अकोला ■ वर्ष १५ ■ अंक १९१ ■ शनिवार, दि. १७ जानेवारी २०२६ ■ मुल्य ३ रुपये ■ पृष्ठे ६

RNI No.- MAHMAR/2012/49642 ■ Postal Regn. No. AKL DN/283/2024-2026 http://epaper.citynewssuperfast.com




## निवडणुकीत 100 कोटींची 'पेरणी'

# 1000 कोटींची 'फिल्डिंग'



प्रतिनिधी १७ जानेवारी

**अकोला :** अकोला महापालिकेच्या निवडणुकीत उमेदवारांनी पाण्यासारखा पैसा खर्च केला. २० प्रभागांत मिळून सुमारे १०० कोटी रुपये मतदारांच्या पदरात पडले असले, तरी हा खर्च म्हणजे निव्वळ 'गुंतवणूक' असल्याचे आता स्पष्ट होत आहे. सर्वच राजकीय पक्षांनी मिळून व उमेदवारांनी जवळपास १०० कोटींचा खर्च या निवडणुकीत केला. आता हा लावलेला खर्च उमेदवार नक्कीच काढेल. अकोल्यात सत्तेत येणाऱ्या नेत्यांसमोर सर्वात मोठे आमिष हे एक हजार कोटींच्या कामाच्या फिल्डिंगकडे असणार आहे. त्या दृष्टीने महापालिकेत सत्ता स्थापनेच्या हालचालींना वेग येणार आहे. सोमवारी राजपत्रात नगरसेवकांच्या नावे प्रकाशित होतील. त्यानंतर खऱ्या अर्थाने सत्ताकारणाला वेग येईल.

गेली पंधरा दिवस अकोलेकरांच्या हातात पैसा चांगलाच खेळला. राजकारण्यांच्या तिजोरीतून हा आलेला पैसा अगदी पाण्यासारखा वाहला. आता मात्र राजकारण्यांनी गुंतवणुक केलेल्या पैशाची परतफेड कशी होते याचा आराखडा आखणे सुरु केले आहे. त्यात अकोल्यात सत्ता कोणाची हा अतिशय गंभीर प्रश्न समोर असून कोणालाच स्पष्ट बहूमत नाही. अशा वेळी एक हजार ते दीड हजार कोटींच्या प्रोजेक्टवर लक्ष ठेवत अकोल्यातील सत्ता कारणात अजून चाळीस ते पन्नास कोटींची गुंतवणूक राजकारणी नगरसेवकांवर नक्की करतील अशी स्थिती निर्माण झाली आहे.

निवडणुकीतील या गुंतवणुकीचा परतावा मिळवण्यासाठी राजकारणी सत्ता स्थापनेनंतर राज्य सरकारने हस्तांतरित केलेल्या २४,५७९ चौरस मीटर भूखंडाकडे सर्वात पहिले लक्ष देतील. मोक्याच्या ठिकाणी असलेले भाजी बाजार हा 'अडीच एफएसआय' अर्थात हे बांधकाम ६.५ लाख चौरस फुटांच्या वर जाईल. त्या ठिकाणी किमान ३० हजार स्वेअर फुटचा भाव गृहित धरला तर जवळपास दोन हजार कोटींचा हा प्रोजेक्ट होईल. या दोन हजार कोटींच्या प्रोजेक्ट मध्ये किती हातात पडतील यावर राजकीय नेते मंडळीचे लक्ष राहणार आहे.

शासनाने बसस्थानक आणि भाजी मार्केटसाठी जी जागा महापालिकेला दिली आहे. भाजी बाजाराचे बांधकाम करताना 'बिल्डर-राजकारणी' साखळी प्रीमियम एफएसआय आणि वाढीव चटईक्षेत्राचा वापर करून व्यावसायिक गाळे आणि शोरूम्सची संख्या वाढवणार आहे.

### सोन्याचे अंडे देणारी कोंबडी

'अकोलेकरांना मिळालेले १०० कोटी म्हणजे केवळ 'ट्रेलर' होता, खरा 'पिक्चर' तर महापालिकेच्या तिजोरीवर आणि या अवाढव्य भूखंडावर सत्ता मिळवल्यानंतर सुरू होईल. 'भाजी बाजार 'विकास' कमी आणि 'व्यावसायिक हित' जास्त असल्याचे चित्र आहे. २४ हजार चौरस मीटरची ही जागा अकोल्याच्या सोन्याचे अंडे देणारी कोंबडी ठरणार आहे.

अकोल्याच्या मध्यवस्तीत असलेल्या या जागेचे शासकीय रेडी रेकनर दर जरी वेगळे असले, तरी बाजारमूल्य गगनाला भिडलेले आहे. अडीच एफएसआयमुळे निर्माण होणाऱ्या लाखो चौरस फूट जागेत व्यावसायिक गाळे बांधून त्यांची चढ्या दराने विक्री करणे. मोक्याच्या जागेवरील गाळे वाटपात ठराविक 'प्रिमियम' वसुली. बांधकाम नियमावलीतील पळवाटा शोधून अतिरिक्त बांधकाम पदरात पाडून घेणे हे पुढील लक्ष राजकीय नेते मंडळीचे राहणार आहे. राजकीय नेते मंडळी स्वतःच्या किंवा नातेवाईकांच्या नावाने मोक्याचे गाळे राखून ठेवणे आणि नंतर ते भाड्याने किंवा विक्रीला काढणे. यातून होणारी एकूण उलाढाल ५००-१००० कोटींच्या घरात जाण्याचा अंदाज वर्तवला जात आहे.

## मुंबईत भाजप नंबर १!

प्रतिनिधी १७ जानेवारी

**मुंबई :** मुंबई महानगरपालिका निवडणुकीचा निकाल शुक्रवारी जाहीर झाला. भाजपने ८९ जागा जिंकत सर्वात मोठा पक्ष होण्याचा पुन्हा एकदा मान मिळवला. तसेच मुंबई महानगरपालिकेवर गेल्या २५ वर्षांपासून असलेली शिवसेना आणि ठाकरेंच्या सत्तेला भाजप-शिंदे सेनेच्या युतीने सुरुंग लावला. यंदाच्या मुंबई महानगरपालिकेच्या निवडणुकीपूर्वी मुंबईचा महापौर कधी आणि कोण होणार? याची जोरदार चर्चा रंगली होती. ठाकरे बंधूंनी मुंबईचा महापौर हा मराठी व्यक्तीच असेल, असं जाहीर केलं होतं. त्यामुळे सुरुवातीला मुंबईचा महापौर हिंदू होणार, असं बोलणाऱ्या भाजपला नंतर नंतर महापौर मराठी व्यक्तीच होईल, हे स्पष्ट करावं लागलं. आता बृहन्मुंबई महानगरपालिकेचा महापौर कधी आणि कोण होणार? याची उत्सुकता सर्वांना लागली आहे. त्याचदरम्यान, मुंबईच्या महापौरबाबत एक महत्त्वाची अपडेट समोर आली आहे. मुंबईचा महापौर नेमका कधी आणि कोण होणार? यासाठी जानेवारी महिन्याच्या अखेरपर्यंत वाट पाहावी लागणार आहे. खात्रीलायक सूत्रांच्या माहितीनुसार, या महिन्याच्या म्हणजेच जानेवारी अखेरीस महापौर निवड होण्याची शक्यता आहे.

## अकोला महापालिकेचे विजयी नगरसेवक

**प्रभाग क्रमांक १ :**
अ : शेख अब्दुल्ला : काँग्रेस
ब : अजरा नसरीन मकसूद खान : काँग्रेस
क : निलोफर खान : काँग्रेस
ड : अब्दूल सलाम खान : काँग्रेस

**प्रभाग क्रमांक २ :**
अ : सीमा अंजुम : एमआयएम
ब : शरद तुरकर : भाजप
क : मैमूना बी : एमआयएम
ड : सय्यद रहीम सय्यद हाशम : एमआयएम

**प्रभाग क्रमांक ३ :**
अ : शशिकला काळे : भाजप
ब : नितू महादेव जगताप : भाजप
क : प्रशांत गोविंदराव जोशी : भाजप
ड : निलेश रामकृष्ण देव : वंचित

**प्रभाग क्रमांक ४ :**
अ : संदीप शेगोकार : भाजप
ब : शिल्पा वरोकार : भाजप
क : पल्लवी मोरे : भाजप
ड : अभय खुमकर : शिवसेना उबाठा

**प्रभाग क्रमांक ५ :**
अ : विद्या खंडारे : भाजप
ब : जयंत मसने : भाजप
क : रश्मी अवचार : भाजप
ड : विजय अग्रवाल : भाजप

**प्रभाग क्रमांक ६ :**
अ : आरती घोगलिया : भाजप
ब : हर्षद भांबेरे : भाजप
क : निकिता देशमुख : भाजप
ड : पवन महल्ले : भाजप

**प्रभाग क्रमांक ७ :**
अ : सुवर्णरेखा जाधव : काँग्रेस
ब : चांद चौधरी : अपक्ष
क : किरण मेश्राम : जमीला बी : काँग्रेस
ड : शेख फरीद शेख करीम : काँग्रेस

**प्रभाग क्रमांक ८ :**
अ : सोनाली सरोदे : उबाठा
ब : मनोज पाटील : उबाठा
क : माधुरी क्षिरसागर : भाजप
ड : राजेश्वर धोटे : भाजप

**प्रभाग क्रमांक ९ :**
अ : प्रिया सिरसाट : काँग्रेस
ब : निखत अफसर कुरेशी : काँग्रेस
क : कनिजा खातून : काँग्रेस
ड : मोहम्मद फजलू पहेलवान : काँग्रेस

**प्रभाग क्रमांक १० :**
अ : मंजुषा शेळके : भाजप
ब : वैशाली शेळके : भाजप
क : अनिल गरड : भाजप
ड : नितीन ताकवाले : भाजप

**प्रभाग क्रमांक ११ :**
अ : जैनब बी : काँग्रेस
ब : शाहीन अंजुम : काँग्रेस
क : फिरदोस परवीन : काँग्रेस
ड : डॉ. झिशान हुसेन : काँग्रेस

**प्रभाग क्रमांक १२ :**
अ : संतोष डोंगरे : भाजप
ब : कल्पना गोटफोडे : भाजप
क : उषा विरक : शिंदे सेना
ड : सागर भारूका : उबाठा

**प्रभाग क्रमांक १३ :**
अ : विशाल इंगळे : भाजप
ब : प्राची काकड : भाजप
क : सुनिता अग्रवाल : भाजप
ड : आशिष पवित्रकार : अपक्ष

**प्रभाग क्रमांक १४ :**
अ : उज्वला पातोडे : वंचित
ब : जयश्री बहादूरकर : वंचित
क : पराग गवई : वंचित
ड : शेख शमसु शेख साबिर : वंचित

**प्रभाग क्रमांक १५ :**
अ : हरीश अलिमचंदानी : भाजप
ब : मनिषा भंसाली : भाजप
क : शारदा खेडकर : भाजप
ड : बाळ टाले : भाजप

**प्रभाग क्रमांक १६ :**
अ : सिद्धार्थ उपर्वट : भाजप
ब : अमरीन सदफ : राष्ट्रवादी शरद पवार
क : नर्गिस परवीन खान : राष्ट्रवादी अजित पवार
ड : रफिक सिद्दीकी : राष्ट्रवादी शरद पवार

**प्रभाग क्रमांक १७ :**
अ : जया गेडाम : काँग्रेस
ब : अमोल मोहोकार : भाजप
क : रफिया बी : काँग्रेस
ड : आझाद खान : काँग्रेस

**प्रभाग क्रमांक १८ :**
अ : स्मिता कांबळे : काँग्रेस
ब : अमोल गोगे : भाजप
क : आर्शिया परवीन : काँग्रेस
ड : फिरोज खान : काँग्रेस

**प्रभाग क्रमांक १९ :**
अ : धनंजय धबाले : भाजप
ब : गजानन सोनोने : भाजप
क : योगिता पावसाळे : भाजप
ड : पुजा गावंडे : राष्ट्रवादी शरद पवार

**प्रभाग क्रमांक २० :**
अ : विजय इंगळे : उबाठा
ब : सुरेखा काळे : उबाठा
क : सोनाली अंधारे : भाजप
ड : विनोद मापारी : भाजप

## अपक्ष राहूनही आशिष पवित्रकार ठरले 'धुरंधर'!

प्रतिनिधी १७ जानेवारी

**अकोला :** महानगरपालिका निवडणुकीत अनेक घडामोडी घडल्या असल्या तर शेवटी मतदारांनी आपला हक्क योग्य ठिकाणी बजावल्याचे मतमोजणीतून सिद्ध झाले आहे. त्याचप्रमाणे पक्षापेक्षा व्यक्तीला महत्त्व देणारे निकाल लागले असल्याचेही दिसून आले. आशिष पवित्रकार यांच्यासह चौघांना पक्षातून निलंबित करण्यात आले होते. त्यानंतर ऐन निवडणुकीच्या तोंडावर मोठ्या राजकीय घडामोडी होऊन यातील तिघांना पक्षात सामावून घेण्यात आले. मात्र आशिष पवित्रकार यांना सामावून घेण्यात आले नाही. त्यामुळे स्वाभिमान दुखावलेल्या पवित्रकार यांनी अपक्ष राहून किल्ला लढवित मतदारांनी त्यांनी भरभरून मताचे



दान दिले. आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर ते तिसऱ्यांदा निवडून येत 'धुरंधर' ठरले आहेत.

अकोला पश्चिम विधानसभा मतदारसंघात गेल्या विधानसभा निवडणुकीदरम्यान पक्षविरोधी कृत्यांचा ठपका ठेवत भाजपाने ज्येष्ठ नगरसेवक हरीश आलिमचंदानी, माजी नगरसेवक ॲड. गिरीश गोखले, भाजपाचे पदाधिकारी अतुल हातवळणे तसेच माजी नगरसेवक आशिष पवित्रकार यांच्याविरुद्ध कठोर भूमिका घेत थेट पक्षातून निलंबनाची कारवाई केली होती.

## महानगरपालिकेच्या निवडणुकीला गालबोट!

**भाजपाच्या नवनिर्वाचित नगरसेवकावर जीवघेणा हल्ला ▶▶ अकोट फैल परिसरात तणावपूर्ण शांतता**

प्रतिनिधी १७ जानेवारी

**अकोला :** महापालिका निवडणूक आणि मतमोजणीची प्रक्रिया शांततेत पार पडली असतानाच निवडणुकीच्या निकालानंतर अकोट फैल परिसरात एका नवनिर्वाचित भाजपाच्या नगरसेवकावर जीवघेणा हल्ला झाल्याने गालबोट लागले. क्षणातच विजयाचा आनंद भीती आणि दहशतीत बदलल्याने या परिसरात तणावपूर्ण शांतता पसरलेली दिसून आली. प्रभाग क्रमांक २ मधून भाजपाचे शरद तुरकर विजयी होताच राजकीय वैमनस्य पेटले आणि त्याचे रूप थेट हिंसक उद्रेकात झाले. शुक्रवारी मध्यरात्रीच्या सुमारास अकोटफैल परिसरात तुरकर यांच्यावर धारदार शस्त्रांनी हल्ला करण्यात आला. या हल्ल्यात नवनिर्वाचित नगरसेवक जखमी झाले असून, त्यांना



तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले. निकालानंतर पक्षांतर्गत नाराजीचा भडका उडाल्याची चर्चा आहे. याच प्रभागातील भाजपाचे उमेदवार नितीन राऊत यांचा पराभव झाला. राऊत यांच्यासाठी तुरकर यांनी अपेक्षेप्रमाणे प्रचार केला नाही, त्यामुळेच पराभव ओढवला, असा आरोप करत राऊत समर्थक आक्रमक झाले आणि तुरकर यांना लक्ष्य करण्यात आल्याची माहिती पुढे आली आहे. वादावादीचे रूपांतर क्षणार्धात हल्ल्यात झाले. हल्ल्यापुरतेच प्रकरण थांबले नाही. तुरकर यांच्या घराजवळ उभ्या असलेल्या काही वाहनांचीही तोडफोड करण्यात आली. अचानक घडलेल्या या प्रकारामुळे संपूर्ण परिसरात भीतीचे सावट पसरले. नागरिकांनी घरांचे दरवाजे बंद करत स्वतःला सुरक्षित ठेवण्याचा प्रयत्न केला. घटनेची माहिती मिळताच अकोटफैल पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. परिस्थिती नियंत्रणाबाहेर जाऊ नये म्हणून मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात आला. जमाव आक्रमक झाल्याने पोलिसांना सौम्य लाठीचार्ज करावा लागल्याची माहिती आहे. पोलिसांच्या तत्पर कारवाईमुळे पुढील अनर्थ टळल्याचे सांगण्यात येत आहे. या प्रकरणाचा सखोल तपास अकोटफैल पोलिस करत असून, संबंधितांवर कठोर कारवाई होणार असल्याचे संकेत देण्यात आले आहेत.

## काँग्रेसकडून सत्ता स्थापनेची फिल्डिंग

प्रतिनिधी १७ जानेवारी

**अकोला :** अकोला महानगरपालिकेच्या निवडणुकीत कोणत्याही एका पक्षाला स्पष्ट बहुमत न मिळाल्याने सत्तेचा पेच निर्माण झाला आहे. ८० जागांच्या सभागृहात बहुमतासाठी ४१ चा आकडा गाठणे आवश्यक असताना, ३८ जागा जिंकून भाजप सर्वात मोठा पक्ष ठरला आहे. दुसरीकडे, २१ जागांसह काँग्रेसने दुसऱ्या क्रमांकावर झेप घेतली असून दोन्ही आघाड्यांनी सत्ता स्थापनेसाठी जोरदार मोर्चेबांधणी सुरू केली आहे.

भाजपला बहुमतासाठी केवळ ३ जागांची गरज आहे.

**एकूण पक्षीय बलाबल**

| | |
|---|---|
| एकूण जागा : | ८० |
| बहुमताचा आकडा : | ४१ |
| भाजप : | ३८ |
| काँग्रेस : | २१ |
| उबाठा : | ०६ |
| शिंदे सेना : | ०१ |
| अजित राष्ट्रवादी : | ०१ |
| शरद राष्ट्रवादी : | ०३ |
| वंचित : | ०५ |
| एमआयएम : | ०३ |
| अपक्ष : | ०२ |

भाजपकडे स्वतःचे ३८ नगरसेवक आहेत. महायुतीमधील मित्रपक्ष असलेल्या शिंदे यांची शिवसेना (०१) आणि अजित पवार यांची राष्ट्रवादी (०१) यांना सोबत घेतल्यास हा आकडा ४० पर्यंत पोहोचतो.

## भाजपने नाकारले, जनतेने स्वीकारले!



**अकोला :** अत्यंत प्रतिष्ठेच्या झालेल्या प्रभाग २० अ च्या लढतीत शिवसेना उबाठा गटाचे विजय इंगळे यांनी तब्बल ८ हजार १९० मतांनी विजय मिळविला आहे. विशेष म्हणजे त्यांनी भाजपाच्या उमेदवाराचा जवळपास २ हजार मतांनी पराभव केला आहे.

विजय इंगळे यांनी भाजपाने नाकारल्याने त्यांनी प्रभाग क्र. २० अ मधून शिवसेना उबाठा पक्षावर निवडणूक लढविली. त्यांना पक्षाने जरी नाकारले असले तरी मतदारांनी त्यांना भरभरून मतांचे दान देत विजयी केले.

## मतांची टक्केवारी घसरल्याने मोठा फटका

प्रतिनिधी १७ जानेवारी

**अकोला:** अकोला महानगरपालिकेच्या निवडणुकीत मतदारांनी दिलेल्या कौलामुळे शहराच्या राजकारणात नवे समीकरण आकारास आले आहे. एकूण ८० जागांच्या महापालिकेत बहुमताचा आकडा ४१ असताना कोणत्याही एकट्या पक्षाला स्पष्ट बहुमत मिळालेले नाही. मात्र, सर्वाधिक जागा आणि सर्वाधिक मते मिळवत भाजपने पहिल्या क्रमांकावर बाजी मारली आहे.

पक्षीय बलाबलाचा आढावा घेतला असता, भाजपला ३८ जागा मिळाल्या असून काँग्रेस २१ जागांसह दुसऱ्या क्रमांकावर आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाला ६ जागा, वंचित बहुजन आघाडीला ५ जागा, राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाला ३ जागा, एमआयएमला ३ जागा तर अपक्ष १, महानगर विकास आघाडी १ जागेवर विजयी झाली आहे. शिवसेना (शिंदे गट) आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) या दोन्ही पक्षांना प्रत्येकी १ जागेवर समाधान मानावे लागले आहे.

मतदानाच्या टक्केवारीकडे पाहिले असता, भाजपने ३ लाख ४७ हजार ६९३ मते मिळवत २८.३४ टक्के मतदान आपल्या पारड्यात पाडले. काँग्रेसला २ लाख ७ हजार ५५९ मते म्हणजेच १६.९२ टक्के मतदान मिळाले. शिवसेना (उबाठा) गटाने १ लाख ४२ हजार ५० मते (११.५८ टक्के) मिळवत तिसरा क्रमांक राखला. वंचित बहुजन आघाडीला

| राजकीय पक्ष | प्राप्त जागा | एकूण मतदान | टक्केवारी |
|---|---|---|---|
| भाजप | ३८ | ३,४७,६९३ | २८.३४ |
| काँग्रेस | २१ | २,०७,५५९ | १६.९२ |
| शिवसेना (उबाठा) | ०६ | १,४२,०५० | ११.५८ |
| शिवसेना | ०१ | १,१९,१११ | ९.७१ |
| वंचित | ०५ | १,३२,७८८ | १०.८२ |
| एम आय एम | ०३ | ८२,३५८ | ६.७१ |
| राष्ट्रवादी (शरद पवार) | ०३ | ३६,७७६ | ३.०० |
| राष्ट्रवादी (अजित पवार) | ०१ | ५३,९९३ | ४.४० |
| अपक्ष | ०१ | ४२,९७४ | ३.५० |
| महानगर विकास समिती | ०१ | २४,०५४ | १.९६ |
| मनसे | ०० | २२,०५२ | १.८० |

१ लाख ३२ हजार ७८८ मते (१०.८२ टक्के) मिळाली असली तरी जागांच्या बाबतीत पक्षाला अपेक्षित यश मिळाले नाही. शिवसेनेला १ लाख १९ हजार १११ मते (९.७१ टक्के) मिळाली. एमआयएमला ८२ हजार ३५८ मते (६.७१ टक्के) मिळाली असून ३ जागांवर विजय मिळवण्यात पक्षाला यश आले.

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार) गटाला ५३ हजार ९९३ मते (४.४० टक्के), अपक्षांना ४२ हजार ९७४ मते (३.५० टक्के) तर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार) गटाला ३६ हजार ७७६ मते (३.०० टक्के) मिळाली. महानगर विकास समितीला २४ हजार ५४ मते (१.९६ टक्के) आणि मनसेला २२ हजार ५२ मते (१.८० टक्के) मिळाली असली तरी या दोन्ही संघटनांना एकही जागा मिळवता आलेली नाही. मतांची टक्केवारी आणि मिळालेल्या जागांमधील तफावत हा या निवडणुकीचा महत्त्वाचा मुद्दा ठरला आहे. भाजप बहुमताच्या उंबरठ्याजवळ पोहोचला असला तरी सत्ता स्थापनेसाठी आता युती आणि पाठिंब्याच्या राजकारणाला वेग येण्याची शक्यता आहे. अकोला महापालिकेच्या सत्तेची चावी कोणाच्या हाती जाणार, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## जयश्री बहादूरकर ठरल्या सर्वाधिक मते घेणाऱ्या उमेदवार!



**अकोला :** महानगरपालिका निवडणुकीत सर्वाधिक मते मिळवून विजयी होण्याचा मान वंचित बहुजन आघाडीच्या जयश्री बहादूरकर यांनी मिळविला. जयश्री बहादूरक ह्यांनी प्रभाग क्रमांक १४ ब मधून निवडणूक लढवित ९ हजार ९८७ मते मिळविले. शहरातील विविध २० प्रभागांतील ८० जागांसाठी विजयी झालेल्या उमेदवारांना मिळालेल्या मतांची आकडेवारी विचारात घेता, प्रभाग क्र. १४ मधील ब मध्ये 'वंचित'च्या जयश्री बहादूरकर यांनी सर्वाधिक ९ हजार ९८७मते प्राप्त करीत विजय मिळविला.

सिटी न्यूज अमरावती
शनिवार, दि. १७ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## नांदुऱ्यात घरफोडी; दागिने लंपास

**खामगाव :** नांदुरा शहरातील वीर लक्ष्मी नगर परिसरातील एका घरात अज्ञात चोरट्याने दरवाजाचा कडी-कोंडा तोडून घरात प्रवेश केला. कपाटातील रोख रक्कम व सोन्या-चांदीचे दागिने असा एकूण २ लाख ५ हजार ९७२ रुपयांचा मुद्देमाल लंपास केल्याची घटना १६ जानेवारी रोजी उघडकीस आली. याप्रकरणी अखिलेश प्रेमेंद्र अंधारे (वय २७, रा. वीर लक्ष्मी नगर, नांदुरा) यांनी नांदुरा पोलिस ठाणे येथे फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, त्यांच्या घरातील कपाटात ठेवलेले आई व मावशी यांचे जुने सोन्या-चांदीचे दागिने (किंमत १,८४,७७२ रुपये), तसेच ९,५०० रुपये रोख रक्कम, असा एकूण २,०५,९७२ रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्याने चोरून नेला. याप्रकरणी नांदुरा पोलिसांनी अज्ञात चोरट्याविरुद्ध भारतीय न्याय संहिता २०२३ च्या कलम ३३१ (४) व ३०५ (अ) अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास नांदुरा पोलिस स्टेशनचे पोलिस उपनिरीक्षक विनीत घाटोळे करीत आहेत.

# भाजपाला राणांशी युती तोडणे पडले महागात?

संदीप मानकर १७ जानेवारी



**अमरावती :** यंदाची अमरावती महानगरपालिकेची निवडणूक अतिशय चुरशीची आणि अटीतटीची झाली.

भाजपला जरी ८७ पैकी २५ जागांवर नगरसेवक निवडण्यात यश आले असले तरीही गत निवडणुकीच्या तुलनेत भाजपच्या ४०ञ् जागा घटल्या असून निवडणुकीची रणधुमाळी रंगली असतानाच पालक मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी रवी राणा यांच्या युवा स्वाभिमान पक्षाची युती तोडल्याने भाजपला ही खेळी फारच महागात पडली आहे.

या निवडणुकीत आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमानी पक्षाने १५ जागा जिंकून ते बडनेरा चे कसे किंगमेकर आहेत हे दाखवून दिले आहे. व अमरावतीच्या राजकारणात त्यांचे कसे महत्त्वाचे स्थान आहे. हे सिद्ध केले आहे.

भाजपच्या बड्या नेत्यांच्या अंतर्गत वादामुळे ही भारतीय जनता पार्टीला अमरावतीत फटका बसल्याचे बोलले जात आहे. या निवडणुकीत सर्वात मोठा पक्ष भाजप ठरला असून भाजपला २५ जागा मिळाल्या आहे. तर आमदार रवी राणा यांच्या युवा स्वाभिमानी पक्षाला १५ जागा मिळाले आहे.

आमदार खोडके दाम्पत्यांच्या राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाला ११ जाग्यावर समाधान मानावे लागले. त्यांनी ८५ ठिकाणी आपले उमेदवार उभे केले होते.

तर एम आय एम पक्षाला १२ जागा, कॉंग्रेसला १५ जागा, शिवसेना शिंदे गटाला ३ जागा, शिवसेना उबाठाला २ जागा, बसपा ला ३ जागा, तर बहुजन वंचित आघाडीला १ जागा मिळाली आहे. यंदाची निवडणूक अमरावतीसाठी हाय व्होल्टेज ठरली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, राज्याचे महसूल व अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, भाजपचे नेते तथा मंत्री नितेश राणे, यांनी भाजपासाठी अमरावती सभा गाजवल्या.

तरीही भाजपाला अपेक्षित यश न मिळाल्याने जनतेने खऱ्या अर्थाने भाजपला नाकारल्याचे भावना मतदारांमध्ये होत्या.

तर शिवसेना शिंदे गटासाठी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची सभा पार पडली. मात्र अडसूळ पिता- पुत्रांना अमरावतीकरांनी सपशेल नाकारले असून त्यांना त्यांची जागा दाखवून दिली आहे.

शेवटच्या टप्प्यापर्यंत जागा वाटपावरून भाजपाशी शिवसेना शिंदे गटने युती न केल्याने शिवसेना शिंदे गटाला फक्त तीन जागांवर समाधान मानावे लागले आहे.

योग्य उमेदवारांना कॅप्टन अभिजीत अडसूळ यांनी उमेदवारी न दिल्याने त्यांना पराभवाचा सामना करावा लागला.

तसेच निवडणुकीच्या तोंडावर माजी पालकमंत्री जगदीश गुप्ता यांनी शिवसेना शिंदे गटाला राम राम केला. त्यानंतर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी त्यांची मनधरणी करून पुन्हा त्यांना व्यासपीठावर आणले खरी मात्र त्यांचाही या निवडणुकीत प्रभाव जाणवला नाही. शिवसेना शिंदे गटातही अंतर्गत वाद मोठा होता. त्यामुळे त्यांना सुद्धा फटका बसला आहे.

शिवसेना शिंदे गटाचे मंत्री संजय राठोड यांनी अमरावतीच्या ग्रँड मैफिलीन हॉटेलमध्ये तीन ते चार दिवस बंद रूम मध्ये नियोजन केले खरे, मात्र त्यांचाही काही प्रभाव दिसून आला नाही. बंद रूम मध्ये नियोजन करण्या ऐवजी ते अमरावती शहरात फिरले असते तर शिंदे गटाच्या काही जागा वाढल्या असत्या अशी चर्चा आता रंगू लागली आहे.

शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या प्रचारासाठी मुंबईतून एकही बडा नेता अमरावतीत आला नाही. त्यामुळे माजी खासदार अनंत गुढे व त्यांच्या टीमला किल्ला लढवावा लागला. मात्र त्यांना नेहमीप्रमाणे यश आले नसून दोन जागांवर समाधान मानावे लागले.

राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाला ३० पेक्षा जास्त जागा मिळतील. असा विश्वास आमदार संजय खोडके व आमदार, सुलभा खोडके यांना होता. त्यांनी मुस्लिम बहुल प्रभागात खेळलेली खेळी त्यांची सपशेल फसली. त्यांनी ही भाजपाशी सुरुवातीपासून युती केली नाही. त्यामुळे जनतेने त्यांनाही नाकारले आहे. त्यांनाही फक्त अकरा जागांवर समाधान मानावे लागले.

### भाजपच्या ४० टक्के जागा घटल्या

राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाला तर खाताही उघडता आले नाही. उपमुख्यमंत्री अजित पवार शरद पवारांचे राष्ट्रवादी कॉंग्रेस मधून बाहेर पडल्यानंतर अमरावतीत राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाची ताकद वाढली तर राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाची ताकद कमी झाली आहे. या निवडणुकीतून ते दिसून आले.

मात्र यंदाच्या निवडणुकीत एम आय एम पक्षाने चांगले यश मिळवले असून १२ जागांवर आपले नगरसेवक निवडून आणले आहे.

कॉंग्रेसने सुद्धा माजी मंत्री यशोमती ठाकूर व खासदार बळवंत वानखडे यांच्या नेतृत्वात कॉंग्रेसला १५ जागा मिळवून दिल्या. मात्र सत्ता स्थापनेसाठी ह्या जागा कमी पडत असल्याची भावना होती.

**भाजपला पकडावे लागणार रवी राणांचा हात**

राज्यात महायुतीमध्ये रवी राणांचा युवा स्वाभिमानी पक्ष ही सामील आहे. त्यामुळे महानगरपालिकेच्या जागा वाटपाच्या संदर्भात युवा स्वाभिमानी पक्षाने भाजपला जागा वाढवून मागितल्या होत्या.

मात्र माजी कृषी मंत्री तथा राज्यसभा खासदार अनिल बोंडे, व माजी पालकमंत्री प्रवीण पोटे यांचा रवी राणा यांच्या युवा स्वाभिमानी पक्षाशी युती करण्यावर किंवा जागा वाढवून देण्यावर अप्रत्यक्षरीत्या विरोधच होता. निवडणूक रंगात आल्यावर भाजपशी युवा स्वाभिमानी पक्षासोबत काही जगांवर युती तर काही जागांवर मैत्री पूर्व लढत होणार असल्याचे संकेतही मिळाले मात्र अमरावती जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी रानांशी भाजपा शी युती तुटल्याची जाहीर करताच, राणा ॲक्टिव्ह झाले. त्यांची बडनेरात येथे आपली असलेली ताकद तया निवडणुकीत दाखवून दिली. त्यांनी साम-दाम-दंड-भेद चा उपयोग करून युवा स्वाभिमानी पक्षाला १५ जागा मिळवून दिल्या.

तर युवा स्वाभिमान मुळे भाजपच्या पाच ते सहा जागा पराभूत झाल्याची तज्ञांचे मत आहे. आमदार रवी राणा यांचे प्रतिस्पर्धी तुषार भारतीय यांच्याही पराभवाला रानाच कारणीभूत असल्याचे राजकीय जाणकार बोलत आहेत.

त्यामुळे राणा बीजेपी वर भारी पडले असले तरी निवडणुकीनंतर रानांनी एक पाऊल पुढे टाकत भाजपचा महापौर होईल? असे जाहीर केले असले तरी ही सुद्धा रानांची एक राजकीय खेळीच असल्याची बोलल्या जात आहे.

मात्र राज्यात महायुतीत असलेल्या अजित पवार गटाचे अमरावतीचे नेते संजय खोडके यांना ही बाब मान्य होणार नाही, राणा दांपत्यांसोबत असलेले त्यांचे वैर जग जाहीर असल्याने भाजपासोबत राणा की खोडके? हा वाद निर्माण झाला आहे. मात्र यावर मुंबई पातळीवर रात्रीपासूनच त्यांना एकत्र बसवण्यासाठी घडामोडी सुरू झाले आहे.

अमरावतीत भाजपचा महापौर बसवण्यासाठी भाजप आता खोडक्यांची मदत घेते कि रानांची ही तर इतर वेळेस सांगणार आहे.

**राणा खोडके एकत्र आल्यास भाजपचा महापौर शक्य**

भाजपचे २५ नगरसेवक रवी राणांचे पंधरा नगरसेवक व राष्ट्रवादी कॉंग्रेस अजित पवार गटाचे अकरा नगरसेवक एकत्र आल्यास भाजपचा महापौर होणे शक्य आहे. मात्र उपमहापौर कोणाचा? यासाठी राणा व खोडकेंमध्ये स्पर्धा निर्माण झाली आहे.

तिकडे कॉंग्रेस सुद्धा एमआयएम ला सोबत घेऊन लहान मोठे पक्ष सोबत घेऊन सत्ता स्थापनेसाठी प्रयत्न करणार असल्याचेही बोलल्या जात आहे.

मात्र कॉंग्रेस सोबत खोडके किंवा युवा स्वाभिमान पक्ष जाणे शक्य नसले तरी राजकारणात काहीही होऊ शकते. त्यामुळे भाजपला या दोन्ही पक्षाची साथ घेणे गरजेचे आहे. यावर पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार काय निर्णय घेतात याकडे मतदारांचे लक्ष लागले आहे.

## नवनीत राणा यांनी लोकसभा पराभवाचा बदला घेतला

### तीन वॉर्डांमधील सामरिक विजयामुळे शहराची राजकीय धुरा बदलली

प्रतिनिधी १७ जानेवारी

**अमरावती:** अमरावती महानगरपालिका निवडणूक ही केवळ स्थानिक सत्तेसाठीची स्पर्धा नव्हती, तर लोकसभा निवडणुकीतील पराभवाचा राजकीय सूडही घेतला. माजी खासदार नवनीत राणा यांनी सुनियोजित रणनीतीद्वारे त्यांच्या विरोधकांना त्यांच्याच बालेकिल्ल्यात पराभूत केले. ज्यामुळे राजकारणातील प्रत्येक हालचालीचा योग्य वेळी प्रतिकार केला जातो हे स्पष्ट झाले. जिल्ह्याच्या राजकारणात या निकालांकडे ठराजकीय हिशेब जुळवण्याचेठ म्हणून पाहिले जात आहे.



राजकीय वर्तुळात अशी चर्चा आहे की, लोकसभा निवडणुकीदरम्यान, तुषार भारतीय, चेतन पवार आणि राजेश साहू पद्डा यांच्यासह काही नेत्यांनी उघडपणे भाजप उमेदवार नवनीत राणा यांच्या विरोधात काम केले. महानगरपालिका निवडणुका जवळ येताच, नवनीत राणा यांनी त्या पार्श्वभूमीचा वापर करून रणनीती आखली आणि सुरुवातीपासूनच त्यांच्या विरोधकांना कोंडीत पकडण्यास सुरुवात केली.

रणनीती बदलते: तीन वेळा नगरसेवक राहिलेले प्रशांत वानखडे युवा स्वाभिमान पक्षात (YSP) सामील झाले

**राणांच्या गृह मतदारसंघात YSP चे वर्चस्व**

आमदार रवी राणांचा गृह मतदारसंघ मानल्या जाणाऱ्या राजापेठ-संत कंवरराम वॉर्ड क्रमांक १८ मध्ये युवा स्वाभिमान पक्षाने भाजपला मोठा धक्का दिला. या वॉर्डमध्ये भाजप फक्त एका जागेवर घसरला. भाजपच्या पद्मजा कौंडन्य ५,६७८ मतांनी विजयी झाल्या, तर युवा स्वाभिमानच्या माधुरी बखडे दुसऱ्या क्रमांकावर आल्या. भाजपचे उमेदवार चेतन पवार ४,२६३ मतांनी पिछाडीवर होते. निवडणुकीपूर्वी माजी नगरसेवक प्रा. प्रशांत वानखडे शिवसेना (उबाथा) ??सोडून युवा स्वाभिमान पक्षात सामील झाले आणि रवी राणांच्या नेतृत्वाखाली ५,४६० मतांनी विजयी झाले. 'ड' मतदारसंघात युवा स्वाभिमानचे महेश मूलचंदानी यांनी राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या राजेंद्र महाले यांचा ५,४७२ मतांनी पराभव केला. एका हाय-प्रोफाइल स्पर्धेत, रितेश नेभनानी यांना भाजपकडून शेवटच्या क्षणी पाठिंबा मिळाला, परंतु त्यांना फक्त १,२३५ मते मिळाली. निवडणूक निकाल जाहीर होईपर्यंत संपूर्ण शहराने या प्रभागातील लढाई पाहिली.

## युवक-युवतींना रोजगारांच्या संधी

### कौशल्य विकास केंद्राचा 'प्लेसमेंट ड्राईव्ह' मंगळवारी

प्रतिनिधी १७ जानेवारी

**अमरावती :** अमरावती जिल्हा कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत सुशिक्षित बेरोजगार युवक-युवतींना रोजगाराच्या संधी उपलब्ध करून देण्यासाठी 'पंडित दिनदयाल उपाध्याय रोजगार मोहिमे'चे आयोजन करण्यात येणार आहे. त्या अंतर्गत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र तथा मॉडेल करिअर सेंटर, अमरावती व शासकीय तंत्रनिकेतन महाविद्यालय, अमरावती यांचे संयुक्त विद्यमाने रोजगार मेळाव्याचे आयोजन मंगळवार, दि. २० जानेवारी २०२६ रोजी होणार आहे. तसेच मेळाव्यामध्ये पार्कसन्स स्किल इन्स्टिट्यूट, नागपूरचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहे.

जिल्ह्यातील युवक-युवतींना नोकरीच्या संधी मिळवून देण्याच्या उद्देशाने जास्तीत-जास्त उमेदवारांना रोजगार मेळाव्यामधून नोकरी देण्याचा प्रयत्न जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रातर्फे करण्यात येतो. त्यात मुख्यमंत्री युवा कार्य प्रशिक्षण योजनेसाठी विविध आस्थापनांचे, कंपन्यांचे प्रतिनिधी प्रत्यक्ष उपस्थित राहून उमेदवारांच्या थेट मुलाखती घेतील. मुलाखतीनंतर पात्र ठरणा-या उमेदवारांना लगेच नोकरीची संधी मिळेल.

या मेळाव्यामध्ये सहभागी होण्यासाठी www.mahaswayamed.goved.in या लिंकवर जाऊन ऑनलाईन नोंदणी करावी. ऽिज्त्दब्सहू वर क्लिक करावे. व्दं एावे हा पर्याय निवडून आपला नोंदणी, आधार कार्ड क्रमांक व पासवर्ड साईन इन करा. आपल्या होम पेजवरील kob Fair हा पर्याय निवडा. District मध्ये Amravati जिल्हा निवडून इगॄ बटनवर क्लिक करावे. नंतर दिनांकित मेळावा निदर्शनास येईल. त्यासमोर असलेल्या Action बटनच्या खाली View व Applyed बटन दिसेल. मेळाव्यास उपस्थित राहणारे उद्योजक व त्यांच्याकडील पदाबाबत माहिती दिसेल. आपल्या पात्रतेनुसार पदाची निवड करून Apply बटनवर क्लिक करा. I Agree हा पर्याय निवडा. शेवटी Succesfuòy Applie for the kob असा Mesage दिसेल. अशा रितीने आपण ऑनलाईन सहभाग नोंदवावा. आपली रजिट्रेशन एत्ज् इঔइ ची प्रिंट काढून मेळाव्याच्या दिनांकास उपस्थित राहावे.

याबाबत काही अडचण असल्यास अमरावती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, दुरध्वनी क्रमांक ०७२१-२५६६०६६ किंवा amravatiro®ar@gmailed.com या इमेलवर संपर्क साधावा. तसेच २० जानेवारी २०२६ रोजी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, शासकीय तांत्रिक विद्यालय परिसर डेपो रोड, अमरावती येथे स्वखर्चाने बायोडाटा, पासपोर्ट साईज फोटो व आवश्यक कागदपत्रासंह कार्यालयात प्रत्यक्ष उपस्थित रहावे, असे आवाहन अमरावती जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्रामार्फत करण्यात आले आहे.

## जिल्ह्यात ७ फेब्रुवारीला 'नवोदय'ची प्रवेश परीक्षा; ३ केंद्रांवर होणार आयोजन

प्रतिनिधी १७ जानेवारी

**अमरावती:** जवाहर नवोदय विद्यालयातील इयत्ता ९ वी आणि ११ वीच्या (लेटरल एन्ट्री) रिक्त जागांसाठीची निवड चाचणी परीक्षा शनिवार, ७ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित करण्यात आली आहे. अमरावती जिल्ह्यातील एकूण ३ परीक्षा केंद्रांवर ही परीक्षा पार पडणार असल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

जवाहर नवोदय विद्यालयातील दर्जेदार शिक्षणाची संधी ग्रामीण आणि शहरी भागातील सर्व पात्र विद्यार्थ्यांना मिळावी, या उद्देशाने ही प्रवेश प्रक्रिया राबविली जात आहे. या परीक्षेसाठी पात्र असलेल्या विद्यार्थ्यांनी वेळेपूर्वी आपली तयारी पूर्ण करावी. परीक्षेच्या नियोजनासाठी निश्चित करण्यात आलेल्या ३ केंद्रांवर आवश्यक सर्व सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या असून, विद्यार्थ्यांनी आपल्या प्रवेशपत्रावर दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. या परीक्षेच्या माध्यमातून ग्रामीण भागातील गुणवंत विद्यार्थ्यांना राष्ट्रीय स्तरावरील शैक्षणिक प्रवाहात येण्याची मोठी संधी मिळणार आहे.

## विधानपरिषदचे सभापती राम शिंदे यांचा दौरा

प्रतिनिधी १७ जानेवारी

**अमरावती:** विधानपरिषदचे सभापती राम शिंदे यांचा रविवार दि. १८ जानेवारी रोजी जिल्ह्याच्या दौरा आहे.

दौऱ्यानुसार शिंदे रविवार, १८ जानेवारी रोजी सकाळी ८ वाजता नागपूर येथून वाहनाने अमरावतीकडे प्रयाण. सकाळी १०.३० वाजता शासकीय विश्रामगृह, अमरावती येथे आगमन व राखीव. सकाळी १०.४५ वाजता शासकीय विश्रामगृह, येथून वाहनाने संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, मोर्शी रोड, अमरावतीकडे प्रयाण करतील. सकाळी ११ वाजता संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवन, मोर्शी रोड, येथे आगमन व राज्यस्तरीय धनगर समाज उपवधू-वर परिचय मेळावा कार्यक्रमास उपस्थिती. त्यानंतर दुपारी १ वाजता अमरावती येथून वाहनाने नागपूरकडे प्रयाण करतील.

## स्नेहसंमेलनातून विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव-दिलीपबाबू इंगोले

### चंद्रभानजी विद्यालयात स्नेहसंमेलन उत्साहात

प्रतिनिधी १७ जानेवारी



**अमरावती:** लहान वयात विद्यार्थ्यांच्या आंतरिक सुप्त गुणांना वाव देण्यासाठी स्नेहसंमेलन हे एक व्यासपीठ असून त्यामाध्यमातून विद्यार्थ्यांची प्रतिभा पुढे येत असते. विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव सर्वप्रथम शालेय स्नेहसंमेलनातूनच मिळत असतो असे प्रतिपादन श्रीराम मंदिर ट्रस्ट, कुंड सर्जापूर चे अध्यक्ष तथा श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कोषाध्यक्ष दिलीपबाबू इंगोले यांनी केले.

येथून जवळच असलेल्या कुंड सर्जापूर येथील चंद्रभानजी विद्यालयाचे दोन दिवसीय स्नेहसंमेलन नुकतेच पार पडले. त्यात उद्घाटकीय कार्यक्रमात अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून श्रीराम मंदिर ट्रस्टचे सदस्य प्राचार्य गजाननराव इंगोले होते. यावेळी ट्रस्टचे सदस्य रमेशपंत बहाळे, वसंतराव मानकर, सुधिरराव कुकडे, संजयराव मानकर, चंद्रशेखरराव मानकर, अशोकराव मानकर, सत्कारमुर्ती व डॉ. पंजाबराव देशमुख अर्बन को-ऑप बँकेचे संचालक अक्षय इंगोले, माजी मुख्याध्यापक आर.एस.गावंडे, रमेशपंत किटूकले व स्वागताध्यक्ष तथा चंद्रभानजी विद्यालयाचे मुख्याध्यापक एन.टी.चव्हाण आदी उपस्थित होते.

सर्वप्रथम दिपप्रज्वलन करून तसेच प्रभू श्री राम, शिक्षणमहर्षी डॉ. पंजाबराव देशमुख, दानदाते स्व.चंद्रभानजी मानकर व विद्यालयाचे संस्थापक स्व.रावसाहेब इंगोले यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून तथा दिप प्रज्वलन करून या स्नेहसंमेनाचे उद्घाटन करण्यात आले. त्यानंतर रांगोळी स्पर्धा, हस्त व पुष्प प्रदर्शनी, गणित कक्ष याचे उद्घाटन सुध्दा मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. या कार्यक्रमात डॉ. पंजाबराव देशमुख बँकेच्या संचालकपदी निवड झाल्याबद्दल अक्षय दिलीप इंगोले तसेच महाराष्ट्र शासनाचा क्रांतीज्योती सावितेर्माई ुले आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त झालेले शाळेचे क्रीडा शिक्षक शरद वसंतराव गढीकर यांचा सर्व मान्यवरांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ व स्मृतिचिन्ह देवून सत्कार करण्यात आला. सत्कारमुर्ती अक्षय इंगोले यांनी सत्काराला उत्तर देतांना ग्रामिण भाग असूनही शाळा ज्याप्रमाणे प्रगती करीत आहे त्याबद्दल सर्वांचे अभिनंदन करून भविष्यातही शाळेने अशीच प्रगती करावी असा आशावाद व्यक्त केला. याप्रसंगी शरद गढीकर यांनी सुध्दा आपल्याला मिळालेला हा पुरस्कार म्हणजे शाळेचा झालेला गौरव असून त्यासाठी सर्वांप्रति त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून मुख्याध्यापक एन.टी.चव्हाण यांनी शाळेच्या वर्षभरातील प्रगतिचा आढावा सादर केला. कार्यक्रमाचे संचालन आर.एस.मानकर यांनी केले. तर आभार स्नेहसंमेलन प्रभारी एस.पी.लाजूरकर यांनी मानले.

दोन दिवसीय या स्नेहसंमेलनात विविध क्रीडा स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, हस्तकला, चित्र्कला व गणित विषयक मॉडेल, प्रश्नमंजूषा, अंताक्षरी स्पर्धा घेण्यात आल्या. तर सांस्कृतिक कार्यक्रमात या सर्व स्पर्धेचे तसेच शाळेच्या सन-२०२५-२६ मध्ये राष्ट्रीय स्तरावरील ३ व राज्यस्तरावरील ६४ खेळाडूंचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून अमरावतीच्या महिला महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. अरुणा वाडेकर होत्या. सांस्कृतिक कार्यक्रमासाठी पालक व गावकरी मंडळीची मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती. यावेळी आयोजित विविध स्पर्धेसाठी प्रमुख अतिथी म्हणून कुंड सर्जापूरचे सरपंच निलेश मानकर, वनारसी गावाच्या सरपंचा ज्योत्स्ना संजयराव मोहोड, हातुर्णाचे सरपंच भरतरीनाथ गौरकर, हातुर्णा ग्रामपंचायतचे सदस्य भुषण वाणे आदी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी शाळेचे मुख्याध्यापक एन.टी.चव्हाण यांच्या मार्गदर्शनात स्नेहसंमेलन प्रभारी एस.पी. लाजूरकर, व्ही.के.राठोड, के.एस.लाजूकर, ए.पी.मांगे, आर.एस.मानकर, ए.व्ही. राजगुरे, शिक्षकेत्तर कर्मचारी सी.ए.शेंडे, आर.आर.मडावी यांच्यासह शाळेतील विद्यार्थी प्रतिनिधी, माजी विद्यार्थी, गावकरी मंडळी यांनी सहकार्य केले.

सिटी न्यूज अकोला
शनिवार, दि. १७ जानेवारी २०२६
http://epaper.citynewssuperfast.com

# संत रंगनाथ महाराज यात्रा महोत्सव साजरा

प्रतिनिधी १७ जानेवारी

**अडगांव बु. :** येथुन जवळच असलेल्या सातपुड्याच्या पायथ्याशी वसलेल्या चित्तलवाडी येथे पंचक्रोशीतील प्रसिद्ध अवलीया संत रंगनाथ महाराज यांचा भव्य यात्रा महोत्सव दरवर्षी प्रमाणे या वर्षी सुध्दा मोठ्या उत्साहात भक्तीपुर्ण वातावरणात संपन्न झाला. यात्रेच्या निमित्ताने गेल्या आठ दिवसापासुन भागवत,कीर्तन, हरीपाठ,असे विविध भक्तीपुर्ण कार्यक्रमाची रेलचेल होती.दि.१३ जानेवारी यात्रेच्या दिवशी संत श्री. रंगनाथ महाराज यांच्या पालखीची मिरवणुक संपुर्ण गावातील प्रमुख मार्गावरून काढण्यात आली यावेळी पालखी चे व महारांजाच्या समाधी मंदिरात भावीकांनी दिवसभर भक्तीभावाने दर्शन घेतले. याठिकाणी महाप्रसादाचे सुद्धा आयोजन करण्यात येऊन हजारो नागरिकांनी महाप्रसाद महाप्रसादाचा लाभ घेतला यात्रा महोत्सव यशस्वी करण्याकरता गावकऱ्यांनी परिश्रम घेतले.

# विजयी उमेदवारांनी उमटवला ठसा

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १४ अ (मलकापुर) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १४ अ | उज्वला प्रविण पातोडे | वंचित | ९४८९ |
| १४ अ | खिल्लारेयोती महेंद्र | शिवसेना उबाठा | ३०४८ |
| १४ अ | दिपालीप्रविण जगताप | भाजप | ५६०३ |
| १४ अ | तेजस्विनीशेषराव बागडे | अपक्ष | २२६ |
| १४ अ | रुचिता सिध्दांत वारके | अपक्ष | १२८ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १४ ब (मलकापुर) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १४ ब | जयश्री महेंद्र बहादुरकर | वंचित | ९९८७ |
| १४ ब | धर्माळे नम्रता प्रमोद | शिवसेना उबाठा | २८८० |
| १४ ब | अस्मीता प्रकाश वगारे | भाजप | ४२९३ |
| १४ ब | वाघ पुजा सागर | शिवसेना शिंदे गट | १३१२ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १४ क (मलकापुर) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १४ क | पराग रामकृष्ण गवई | वंचित | ८९९३ |
| १४ क | इंगळे सागर मधुकर | आमआदमी पार्टी | १६९ |
| १४ क | मुरुमकार जगदीश अवधुतराव | शिवसेना उबाठा | २२७४ |
| १४ क | गोपाल रघुनाथ मुळे | भाजप | ४७२१ |
| १४ क | अब्दुल अनवेज अब्दुल जाकीर | एमआयएम | ६३० |
| १४ क | अर्शदअली अफसर अली | अपक्ष | ५३४ |
| १४ क | डोंगरे रामकृ?ण नामदेव | अपक्ष | ८३ |
| १४ क | विशाल भगवान पाखरे | अपक्ष | ११५२ |
| १४ क | प्रविण देवमन वाहुरवाघ | अपक्ष | १३४ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १४ ड (मलकापुर) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १४ ड | शेख शमशु कमर शेख साबीर | वंचित | ८४४२ |
| १४ ड | मंगेश रामभाऊ काळे | शिवसेना उबाठा | ५९३५ |
| १४ ड | दिलीप तुळशिराम भरणे | भाजप | ३४७३ |
| १४ ड | सोनोने आशिष लक्ष्मण | शिवसेना शिंदे गट | ४७४ |
| १४ ड | संजु बळीराम पानबुडे | अपक्ष | ३१६ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १५ अ (आदर्श कॉलोनी) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १५ अ | आलीमचंदानी हरीश रतनलाल | भाजप | ८२५८ |
| १५ अ | भुषण संजय चौधरी | शिवसेना शिंदे गट | ६९० |
| १५ अ | पंकज ज्ञानेश साबळे | मनसे | २८३९ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १५ ब (आदर्श कॉलोनी) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १५ ब | भंसाली मनीषा रवीन्द्र | भाजप | ५४१४ |
| १५ ब | नंदा दीपक इंगळे | शिवसेना शिंदे गट | १११८ |
| १५ ब | दुर्गीया रेखा विजय | शिवसेना उबाठा | २६८९ |
| १५ ब | संगीता आनंद (पिंटू) वानखडे | राकाँ शरद पवार | २५८० |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १५ क (आदर्श कॉलोनी) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १५ क | शारदा रणजित खेडकर | भाजप | ७५७८ |
| १५ क | कल्पना हनुमंतराव डाहे | शिवसेना उबाठा | २७४५ |
| १५ क | बाजड श्वेता लक्ष्मीकांत | शिवसेना शिंदे गट | १२०८ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १५ ड (आदर्श कॉलोनी) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १५ ड | बाळ टाले | भाजप | ६०३० |
| १५ ड | मोंटु (लक्ष्मण) पंजाबी | शिवसेना उबाठा | ३१३४ |
| १५ ड | प्रधान प्रशांत मधुकर | कॉंग्रेस | ११४१ |
| १५ ड | शर्मा समर्थ विजय | शिवसेना शिंदे गट | १४१६ |
| १५ ड | अग्रवाल लक्ष्मीकांत कैलाश | लोजपा | ७४ |
| १५ ड | विनोद राऊत | अपक्ष | १०८ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १६ अ (सिंधीकॅम्प) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १६ अ | सिध्दार्थ रामदास उपरवट | भाजप | ४८१० |
| १६ अ | रेणु रवि धंजे | शिवसेना शिंदे गट | २६१२ |
| १६ अ | इरशाद हुसैन शाहिस्ता परवीन | राकाँ शरद पवार | २८६४ |
| १६ अ | अब्दुल रुकैय्यापरवीन अनिस | एमआयएम | ३७२४ |
| १६ अ | मिलिंद दिलीप आकोडे | वंचित | १७६९ |
| १६ अ | प्रीती विशाल इंगळे | अपक्ष | २४७ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १६ ब (सिंधीकॅम्प) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १६ ब | अमरीन सदफ सैय्यद नाजीम | राकाँ शरद पवार | ६०९८ |
| १६ ब | मुस्कान आशिष पंजवानी | भाजप | ५६३६ |
| १६ ब | मुलचंदानी वैजयंती राजकुमार | शिवसेना शिंदे गट | ३७२३ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १६ क (सिंधीकॅम्प) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १६ क | नर्गिस परवीन फय्याज खान | राकाँ अजित पवार | ७२१६ |
| १६ क | मिश्रा राजकुमारी राजकुमार | शिवसेना शिंदे गट | ४१७३ |
| १६ क | पुजा आशिष वाधवानी | वंचित | १९१२ |
| १६ क | आहुजा वंदना प्रेम | अपक्ष | २६१४ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १६ ड (सिंधीकॅम्प) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १६ ड | रफिक सिद्दिकी | राकाँ शरद पवार | ५७७४ |
| १६ ड | बडोणे संजय बाबुलाल | भाजप | ३३०६ |
| १६ ड | दर्शन लिलाराम राज | शिवसेना शिंदे गट | ४८७७ |
| १६ ड | सुरेखा मधुकर इंगळे | वंचित | १७०० |
| १६ ड | आशिष गौतम वाकोडे | प्रहार | २३६ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १७ अ (हरिहरपेठ) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १७ अ | गेडाम जया विनोद | कॉंग्रेस | ६३८१ |
| १७ अ | चव्हाण सविता गजानन | शिवसेना शिंदे गट | ३२४८ |
| १७ अ | शितल संतोष डाबेराव | राकाँ अजित पवार | ४७०८ |
| १७ अ | पद्मा दशरथ झळके | एमआयएम | २०८८ |
| १७ अ | गुजर नेहा अमोल | अपक्ष | १३३९ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १७ ब (हरिहरपेठ) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १७ ब | मोहोकार अमोल अवधुत | भाजप | ६८१५ |
| १७ ब | अमरीन तबस्सुम सैय्यद खुर्रम | कॉंग्रेस | ४१७१ |
| १७ ब | किशोर श्रीराम अरुळकर | शिवसेना उबाठा | २६४ |
| १७ ब | अंकिता चेतन गुजर | शिवसेना शिंदे गट | २०१३ |
| १७ ब | अजीज सिकंदर शेख | एमआयएम | ८४४ |
| १७ ब | देवा दशरथ गावंडे | वंचित | ५४७ |
| १७ ब | गीते प्रमिला पुंडलिक | अपक्ष | ९१ |
| १७ ब | शेख मोहम्मद राजिक अब्दुल रउफ | अपक्ष | ३२५३ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १७ क (हरिहरपेठ) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १७ क | रफिया बि याकुब खान | कॉंग्रेस | ६९२० |
| १७ क | वैशाली सुधीर काहकर | राकाँ अजित पवार | ६३८२ |
| १७ क | सुजाता राजु चव्हाण | शिवसेना उबाठा | ५६४ |
| १७ क | गीता रमाशंकर मिश्रा | शिवसेना शिंदे गट | २८१७ |
| १७ क | आयशा अंजुम गुलाम ख्वाजा | एमआयएम | १०९३ |
| १७ क | सौ. सरस्वती किशोर पटेल | अपक्ष | ११२ |
| १७ क | सिमा ऋतिक महाजन | अपक्ष | ४७ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १७ ड (हरिहरपेठ) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १७ ड | आझाद खान अलियार खान | कॉंग्रेस | ७२९९ |
| १७ ड | बाबासाहेब प्रभू घुमरे | राकाँ शरद पवार | ६४ |
| १७ ड | राजेश कृपाशंकर मिश्रा | शिवसेना शिंदे गट | २५७६ |
| १७ ड | सटाळे शारदा ज. मुरलीधर | शिवसेना उबाठा | २१९ |
| १७ ड | साहु करण अशोक | भाजप | ६५१२ |
| १७ ड | फैसल अहमद मुश्ताक अहमद | एमआयएम | ९२७ |
| १७ ड | कदम गणेश श्रीराम | वंचित | ३३५ |
| १७ ड | गोवर्धन कृष्णराव वाघाडे | अपक्ष | ६६ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १८ अ (वाशिमरोड) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १८ अ | कांबळे स्मिता गजानन | कॉंग्रेस | ५५४२ |
| १८ अ | कांबळे वंदना लक्ष्मण | शिवसेना उबाठा | ८०१ |
| १८ अ | कांबळे सरिता सुनिल | भाजप | ४९१३ |
| १८ अ | नवले सपना अश्विन | शिवसेना शिंदे गट | ३७३३ |
| १८ अ | रिता प्रभाकर नवघरे | एमआयएम | २४८६ |
| १८ अ | ॲड शितल सिमांत तायडे | वंचित | १७४७ |
| १८ अ | सुनीता संतोष हिवराळे | अपक्ष | ७२ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १८ ब (वाशिमरोड) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १८ ब | अमोल सुधाकर गोगे | भाजप | ६१८१ |
| १८ ब | अब्दुल रउफ गुलाम नबी | कॉंग्रेस | ५२२२ |
| १८ ब | अविनाश सत्येंद्रनाथ चव्हाण | राकाँ शरद पवार | १८२ |
| १८ ब | दत्ता एकनाथ बावस्कर | शिवसेना उबाठा | ४५६ |
| १८ ब | बजरंग विकास रोडे | शिवसेना शिंदे गट | २३९८ |
| १८ ब | रीजवाना परविन शेख अजीज | एमआयएम | २२०१ |
| १८ ब | कलोरे सुरेश नारायण | वंचित | २४६८ |
| १८ ब | दुधे संजय नारायण | अपक्ष | ५८ |
| १८ ब | पंढरी नामदेवराव दोरकर | अपक्ष | १३५ |
| १८ ब | अजय हरिभाऊ वाळसकर | अपक्ष | ६२ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १८ क (वाशिमरोड) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १८ क | अर्शिया परवीन मोहम्मंद शारिक | कॉंग्रेस | ५४२० |
| १८ क | देशमुख कविता दिलीप | राकाँ अजित पवार | ४९९२ |
| १८ क | अर्चना प्रदीप मुदीराज | शिवसेना शिंदे गट | ३४८९ |
| १८ क | सुरेखा पुरुषोत्तम अहीर | वंचित | २७७५ |
| १८ क | शाइस्ता परवीन शेख अबरार | अपक्ष | २०७९ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १८ ड (वाशिमरोड) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १८ ड | फिरोज खान अलीयार खान | कॉंग्रेस | ५२६१ |
| १८ ड | उमेश सुरेश इंगळे | राकाँ शरद पवार | ३८१ |
| १८ ड | आशिष सुशिल तिवारी | शिवसेना उबाठा | ५७८ |
| १८ ड | नवले अश्विन उध्दवराव | शिवसेना शिंदे गट | ३९२९ |
| १८ ड | अविनाश अनिल मुरेकर | मनसे | ६४४ |
| १८ ड | मिश्रा दिलीप रामकृपाल | भाजप | ५०१२ |
| १८ ड | हुसेन खाँ | बहुजन समाज पार्टी | १११ |
| १८ ड | मोहम्मद रिजवान | एमआयएम | २३७८ |
| १८ ड | सचिन मन्साराम सोनोने | अपक्ष | ७०४ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १९ अ (कौलखेड) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १९ अ | धबाले धनंजय गणपत | भाजप | ५३९८ |
| १९ अ | इंजि. अमोल उत्तमराव इंगळे | राकाँ शरद पवार | ३४५२ |
| १९ अ | अजय माणिकराव इंगोले | शिवसेना शिंदे गट | ३०७७ |
| १९ अ | खंडारे प्रमोद अशोक | शिवसेना उबाठा | ४३८ |
| १९ अ | राहूल श्रावण मस्के | वंचित | ७९४ |
| १९ अ | चांदणे सुनंदा सुधाकर | अपक्ष | ४६ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १९ ब (कौलखेड) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १९ ब | गजानन शालीग्राम सोनोने | भाजप | ५०३२ |
| १९ ब | संगिता वसंत आत्राम | शिवसेना शिंदे गट | ३०८४ |
| १९ ब | अजाबराव श्यामराव उईके | शिवसेना उबाठा | ६८९ |
| १९ ब | नंदकिशोर विठ्ठल ठाकरे | राकाँ शरद पवार | ३१२३ |
| १९ ब | धनश्री रमेश सोने | वंचित | १०८८ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १९ क (कौलखेड) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १९ क | योगिता गणेश पावसाळे | भाजप | ६२६१ |
| १९ क | श्रध्दा प्रणव कोल्हे | राकाँ शरद पवार | ३२१८ |
| १९ क | सारिका रामेश्वर पडुळकर | शिवसेना उबाठा | ६४५ |
| १९ क | सोनाली सतपालसिंह राजपुत | शिवसेना शिंदे गट | ३००१ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. १९ ड (कौलखेड) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| १९ ड | गावंडे पुजा पंकज | राकाँ शरद पवार | ५४२९ |
| १९ ड | प्रतिमा अश्विन पांडेय | शिवसेना उबाठा | ५०९ |
| १९ ड | बडोणे माधुरी संजय | भाजप | ३२५६ |
| १९ ड | नैना निखिल सुकेडे (ठाकुर) | शिवसेना शिंदे गट | ३४४२ |
| १९ ड | पवार रुख्मीनी मुरलीधर | वंचित | ६४२ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. २० अ (खडकी) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| २० अ | विजय रामदास इंगळे | शिवसेना उबाठा | ८१९० |
| २० अ | यश रविंद्र घनबहादुर | शिवसेना शिंदे गट | ८९५ |
| २० अ | नंदा विजय जाधव | मनसे | १७० |
| २० अ | मंगेश भगवान झिने | भाजप | ६३५१ |
| २० अ | अविनाश विश्वनाथ मोरे | अपक्ष | २०९ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. २० ब (खडकी) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| २० ब | सुरेखा मंगेश काळे | शिवसेना उबाठा | ७४६५ |
| २० ब | शारदा वैकुंठ ढोरे | भाजप | ५९४१ |
| २० ब | डॉ. मोहोड नेहा संगम | शिवसेना शिंदे गट | २३५३ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. २० क (खडकी) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| २० क | सोनाली गणेश अंधारे | भाजप | ६६४३ |
| २० क | घोगरे वर्षा राजेश | शिवसेना उबाठा | ६४०७ |
| २० क | वैष्णवी कुणाल शिंदे | शिवसेना शिंदे गट | २५२५ |
| २० क | ज्योती सुनिल शिंगनाद | अपक्ष | १९१ |

### अकोला महानगरपालिका प्रभाग क्र. २० ड (खडकी) प्राप्त मते व विजयी उमेदवार

| | | | |
|---|---|---|---|
| २० ड | विनोद मुरलीधर मापारी | भाजप | ७५५३ |
| २० ड | गौरव शंकरलाल अग्रवाल (गोटु) | शिवसेना शिंदे गट | ७०१ |
| २० ड | ऋषभ राजेश अत्तरकर | आम आदमी पार्टी | १५४ |
| २० ड | बोचरे विजय रामदास | मनसे | १६७ |
| २० ड | शंकर भाउराव लंगोटे | शिवसेना उबाठा | ७३१४ |

## भारतीय सशस्त्र सैन्यदलामध्ये अधिकारी पदाच्या पूर्व प्रशिक्षणाची मोफत सुवर्णसंधी

**अकोला:** भारतीय सैन्यदल, नौदल व वायुदलामध्ये अधिकारी पदावर भरती होण्यासाठी पात्र उमेदवारांना सर्व्हिस सिलेक्शन बोर्ड (एसएसबी) या परीक्षेची पूर्व तयारी करून घेणेसाठी छात्रपूर्व प्रशिक्षण केंद्र, नाशिक रोड, नाशिक येथे महाराष्ट्र शासनातर्फे महाराष्ट्रातील नवयुवक व युवतीसाठी दि. १९ जानेवारी ते ३ एप्रिल २०२६ या कालावधीत एसएसबी कोर्स क्र. ६६ आयोजित करण्यात येत आहे. सदर कोर्ससाठी प्रशिक्षणार्थींची निवास, भोजन आणि प्रशिक्षणाची निःशुल्क सोय करण्यात आली आहे.

# येथील तीन मैत्रीणी सैन्यदलात दाखल



◆ मुलींनी सुद्धा सिद्ध करून दाखविले देश प्रेम



प्रतिनिधी १७ जानेवारी

**हिवरखेड :** येथील तीन तरुणींनी जिद्द चिकाटीने मेहनत करून सैन्यदलात दाखल झाल्या. हलाखीच्या परिस्थितीला मात देत प्रत्येक संकटाचा सामना करून तिघींनी ध्येय गाठले. तीन मैत्रीणी आणि ५ मित्रांची सैन्यदलात निवड झाल्याने त्यांची जल्लोषात विजयी मिरवणूक काढण्यात आली.

चतुर्थी श्रीकृष्ण हागे रा. इंदिरा नगर हिचे २ भाऊ सैन्यदलात असून व ती सुद्धा सैन्यदलात दाखल झाली. तसेच निकिता गावंडे रा. गावड खेडी भवानी मंदिर परिसर आणि शिवानी बाबुराव वाकोडे चंद्रमणी नगर. शिवानी या अगोदर पोलिस भरती मध्ये अपयशी ठरली होती. परंतु तिने विश्वास कमी होऊ दिला नाही. संघर्ष केला म्हणूनच या तिघींच्या पदरात यश आले. तिघींचे गावातील महिला मंडळाच्या वतीने कौतुक करण्यात आले. ह्या तिघींनी आपले श्रेय आईवडिलांना दिले.

# सेंट्रल कृषक सेवा सहकारी संस्थेत लवकरच 'माती परीक्षण' सुरुवात

प्रतिनिधी १७ जानेवारी

**अडगांव बु.:** तेल्हारा तालुक्यातीलच नव्हे, तर संपूर्ण अकोला जिल्ह्यात आपल्या पारदर्शक आणि शेतकरीभिमुख कामासाठी ओळखल्या जाणाऱ्या 'सेंट्रल कृषक सेवा सहकारी सोसायटीला महाराष्ट्र शासनाच्या वतीने १००ज्ञ् अनुदानावर माती परीक्षण केंद्र व दीड लाख रुपये कीमतीचे साहित्य सुध्दा मिळाले आहे. तालुक्यात २ संस्थाना हे माती परीक्षण केद्र मिळाले असुन त्यापैकी अडगांव बु संस्था एक आहे.

एक प्रगतिशील संस्था म्हणून नावारूपास आलेल्या या सोसायटीने सातत्याने शेतकऱ्यांच्या हिताचे निर्णय घेतले आहेत. आतापर्यंत या भागातील शेतकऱ्यांना माती परीक्षणासाठी लांबचा प्रवास करावा लागत असे किंवा खासगी लॅबवर अवलंबून राहावे लागत होते. मात्र, आता संस्थेच्या माध्यमातून ही सुविधा गावातच उपलब्ध होणार असल्याने शेतकऱ्यांची पायपीट थांबणार असून वेळेची खर्चाची मोठी बचत होईल. माती परीक्षणामुळे जमिनीतील घटकांचे अचूक प्रमाण समजण्यास मदत होईल. यामुळे शेतकरी खतांचा संतुलित वापर करू शकतील. परिणामी, शेतीचा अनावश्यक खर्च कमी होऊन उत्पादनात वाढ होण्यास मोठी मदत होणार आहे. आधुनिक शेतीच्या दृष्टीने हे पाऊल अत्यंत महत्त्वाचे मानले जात आहे.

सध्या संस्थेत २ स्वस्त धान्य दुकान,कृषी सेवा केंद्र, ग्राहक सेवा केंद्र,शेतमाल तारण सेवा,या सर्व सुविधा शेतकऱ्यांना एकाच छताखाली मिळत आहेत. आता त्यात 'माती परीक्षणाची भर पडल्याने अडगांव बु. सह संपुर्ण परिसरातून संस्थेचे कौतुक होत आहे. संस्थेने अध्यक्ष मनोहरलालजी फाफट व संचालक मंडळाच्या मार्गदर्शनाखाली अष्टपैलू विकास साधला आहे. भविष्यात अनेक शेतकरी हिताच्या सुविधा उपलब्ध करण्यासाठी संस्था प्रयत्न शिल आहे.

# राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी

प्रतिनिधी १७ जानेवारी

**अडगांव बु :** येथुन जवळच असलेल्या एदलापूर येथील आनंदराव सांगोळे माध्यमिक विद्यालय येथे राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मुख्याध्यापक श्री राऊत सर यांनी दीप प्रज्वलन करून राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या प्रतिमेचे पुजन करुण कार्यक्रमाला सुरुवात केली तर प्रमुख उपस्थीत वरिष्ठ शिक्षक श्री गजानन थुटे सर,तेलगोटे मॅडम,महेश थुटे सर,ज्ञानेश्वर ढोरे,देवानंद दांडगे आदी उपस्थित होते माँ जिजाऊ ची वेशभुषा समीक्षा बनसोड, अक्षरा घासले या विद्यार्थ्यांनीनी केली होती. यावेळी स्वागत गीत शाळेच्या विद्यार्थीनी श्रावणी तराळे,खुशी गायगोळ,दिव्या वानखडे, गौरी मेश्राम, यांनी गायीले. तर राजमाता जिजाऊ यांच्या जिवणावर भाग्यलक्ष्मी फरकुंडे,खुशी गायगोळ,श्रावणी तराळे,यांनी सुरेख गित सादर केले. शिक्षकांनी सुध्दा आपल्या भाषणात राजमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद यांच्या कार्याची माहिती दिली प्रास्ताविक आराध्य तराळे नी केले संचालन शिवणी डोबाळे,मयुरी चोपडे यांनी तर आभार प्रदर्शन दिव्या वानखडे हिने केले.

# धक्का;कुणाला सुखद तर कुणाला दु:खद!

## मतदारांनी दिग्गजांना दिवसा दाखवले तारे; आत्मचिंतन करायला लावणारा निकाल

प्रतिनिधी १७ जानेवारी

**अकोला :** बहुप्रतीक्षित असलेली अकोला महानगरपालिकेची निवडणूक यंदा सर्वांना आश्चर्याचा धक्का देऊन गेली. एककीकडे ५० पारचा दावा करणाऱ्या भाजपाला जागेवर आणले तर काँग्रेसचे अस्तित्व संपले असे म्हणणाऱ्यांना चांगली चपराकही या निवडणूक निकालाने दिली. तर आपला वॉर्ड आपला बालेकिल्ला आहे, अशा भ्रमात असणाऱ्यांना दिवसा तारे मतदारांनी दाखवू दिले आहेत. एकप्रकारे हा निकाल धक्कादायक असाच असून कोणाला सुखद तर कुणाला दु:ख धक्का देऊन गेला. सर्वात महत्त्वाचे म्हणजे सर्वांनाचा हा निकाल आत्मचिंतन करायला लावणारा ठरला आहे.

अकोला महानगरपालिका निवडणुकीत भाजपा हा सर्वात मोठा पक्ष ठरला असला तरी गत निवडणुकीच्या तुलनेत त्यांची कामगिरी माघारली आहे, हे कबूल करावेच लागणार आहे. २०१७च्या निवडणुकीत भाजपाला अकोला शहरवासीयांनी ४८ जागांवर निवडून देत स्पष्ट बहुमत दिले होते. या सात वर्षांच्या कामगिरीचा लेखाजोगा मतदारांनी ठेवत, २०२६च्या निवडणुकीत मात्र यंदा त्यांना साफ नाकारले नसले तरी त्यांना बहुमत सिद्ध करण्यासाठी संघर्ष करायला भाग पाडेल आहे. गत निवडणुकीच्या तुलनेत १० जागा कमी असून, भाजपाला केवळ ३८ जागांवरच समाधान मानावे लागले. सर्वाधिक फटका भाजपाला पश्चिम विधानसभा मतदारसंघात बसल्याचे जाणकारांचे मत आहे. त्यामुळे भाजपाला आता आत्मचिंतन करून आपल्यातील उणीवा शोधून त्या दूर करण्याची गरजही सुज्ञ नागरिक बोलत आहेत. भाजपाची राज्यातील कामगिरी न बघता अकोल्यात आपली स्थिती काय, याचाही विचार करण्याची गरज या निकालाने व्यक्त होत आहे

काँग्रेसने या निवडणुकीत जोरदार मुसंडी मारत सर्वांनाच आश्चर्याचा धक्का दिला आहे. २०१७ च्या निवडणुकीत केवळ १३ जागा जिंकणाऱ्या काँग्रेस पक्षाला या निवडणुकीत ८ जागांची वाढ करीत २१ जागांवर विजय मिळविला आहे. हा निकाल काँग्रेस पक्षाला संजीवनी देणार असून, नेते, पदाधिकारी व कार्यकर्त्यांमध्ये ऊर्जा निर्माण करणार ठरला आहे. काँग्रेस पक्षाने पुन्हा आपले अस्तित्व सिद्ध केले असून, सर्वात मोठा दोन नंबरचा पक्ष ठरला आहे. समीकरणांची जुळवाजुळव निट झाली तर सत्तेवरही येऊ शकतो अन्यथा एक दमदार विरोध पक्ष म्हणून एन्ट्री निश्चितच आहे. वंचित, एमआयएम या पक्षांनीही गत निवडणुकीपेक्षा यंदा कामगिरीत सुधारण केली आहे. या दोन्ही पक्षांना अनुक्रमे ३ आणि १ जागा मिळाली होती. या निवडणुकीत वंचितला ५ तर एमआयएमला ३ जागा मिळाल्या आहेत. शिवसेना उबाठा गटाने आपली ताकद पुन्हा एकदा सिद्ध केली आहे. गत निवडणुकीत ठाकरेसेना व शिंदेसेना यांनी एकत्र निवडणू लढवित ८ जागा बळकावल्या होत्या. मात्र यंदा दोन्ही पक्ष वेगवेगळे झाल्याने शिंदेसेनेचा फुगा फुटला असून, ठाकरेसेने आपले अस्तित्व कायम ठेवले आहे.

### 'धुरंधरां'ना बसला फटका!

हा निवडणूक निकाल अनेक धुरंधरांना हादरा देणारा ठरला आहे. एकहाती किल्ला लढविणाऱ्या या दिग्गजांना मतदारांनी जागेवर आणले आहे. यामध्ये संजय बडोणे, माधुरी बडोणे, सुनील मेश्राम, अजय शर्मा, सागर शेगोकार, मंगेश काळे, अश्विन नवले, राजेश काळे, राजेश मिश्रा, मिलिंद राऊत, शारदा ढोरे, तुषार भिरड, दीपाली जगताप, शीतल गायकवाड आणि सपना नवले या धुरंधरांचा समावेश आहे.

# प्रभाग बदलाने 'कशी खुशी कही गम'!

◆ हरीष अलीमचंदानी मताधिक्क्याने विजयी तर बडोणे दाम्पत्याला फटका

प्रतिनिधी १७ जानेवारी

**अकोला :** यंदा अनेक उमेदवारांनी महापालिका निवडणूक प्रभाग बदलून लढविली. त्यामुळे काहींना आपले अस्तित्व टिकविता आली तर काहींना जबर फटका बसला आहेत. यात हरीष अलिमचंदानी हे प्रचंड मताधिक्क्याने निवडून आले तर संजय बडोणे व माधुरी बडोणे यांना पराभवाचा सामना करावा लागला.

२०१७ च्या महापालिका निवडणुकीत प्रभाग क्रमांक १२ मधून नगरसेवक म्हणून निवडून आलेले भाजपचे हरीष अलीमचंदानी यांना यावेळी प्रभाग १५ अ मधून उमेदवारी मिळाली होती. नव्या प्रभागातही मतदारांनी त्यांच्यावर विश्वास दाखवत त्यांना मो'ा मताधिक्क्याने विजयी केले. दुसरीकडे, २०१७ मध्ये प्रभाग १९ मधून निवडून आलेले संजय बडोने यांनी यावेळी प्रभाग १६ मधून निवडणूक लढवली मात्र अपेक्षेप्रमाणे निकाल लागला नाही. प्रभाग बदलल्याचा फटका त्यांना बसल्याचे बोलले जात असून त्यांना पराभव स्वीकारावा लागला. विशेष म्हणजे, बडोने यांची पत्नी माधुरी बडोने यांनी यावेळी प्रभाग १९ मधून निवडणूक लढवली होती, मात्र त्या ि'काणी कौलखेड येथील पंकज गावंडे यांच्या पत्नी पूजा गावंडे यांनी जोरदार मुसंडी मारत माधुरी बडोने यांचा पराभव केला. या निवडणुकीत बडोने दाम्पत्य एकाचवेळी पराभूत झाल्याने शहराच्या राजकारणात ही बाब चर्चेचा विषय 'रली आहे. मतदारांनी स्थानिक समीकरणे, कामगिरी यांचा विचार करून कौल दिल्याचे या निकालातून स्पष्ट होत आहे. एकूणच महापालिका निवडणुकीतील हे निकाल प्रभाग बदलाच्या रणनीतीला यश-अपयश दोन्ही बाजूंनी दाखवणारे 'रले असून, आगामी काळात पक्ष आणि उमेदवारांना नव्या पद्धतीने रणनीती आखावी लागणार असल्याचे चित्र आहे.



सिटी न्यूज सुपरफास्ट यवतमाळ
शनिवार, दि. १७ जानेवारी २०२६
https://epaper.citynewssuperfast.com

# महिलांच्या हाती पालिकेच्या चाब्या

## पाच समितीच्या सभापतीपदी महिलांची निवड

प्रतिनिधी १७ जानेवारी

**यवतमाळ :** नगरपरिषदेत शुक्रवारी स्थायी समितीसह विषय समितींची निवड प्रक्रिया पार पडली. या प्रक्रियेत महिलांचा दबदबा स्पष्ट दिसून आला. भाजपने महायुतीत शिंदेसेनेला सहभागी करून आपले संख्याबळ मजबूत केले असून, नगराध्यक्षासह पाच समित्यांमध्ये सभापती पदी महिलांची निवड करण्यात आली आहे. त्यामुळे यवतमाळ नगरपरिषदेच्या चाब्या महिलांच्या हाती दिल्या आहे.



नगरपरिषदेच्या विविध समित्यांमध्ये सभापती पदासाठी सकाळी ११ वाजता नामांकन अर्ज भरण्यात आले. समिती सभापती म्हणून भाजपकडून चार महिलांची नावे देण्यात आली, तर महायुतीतील शिंदेसेनेलाही एक समिती सोपवण्यात आली. यामध्ये सार्वजनिक बांधकाम समिती सभापती म्हणून नीता भास्कर केळापुरे, शिक्षण व क्रीडा-सांस्कृतिक कार्य समिती सभापती म्हणून चेतना भवरे, स्वच्छता व सार्वजनिक आरोग्य समिती सभापती म्हणून लता रमेश ठोंबरे, नियोजन व विकास समिती सभापती म्हणून रिता गजानन धावतोडे, महिला व बालकल्याण समिती सभापती म्हणून शिंदेसेनेच्या शोभा उद्धवराव साबळे यांची निवड करण्यात आली. उपसभापती पदावर सोनाली तिडके यांना संधी मिळाली. स्थायी समितीत सदस्य म्हणून भाजपकडून रेखा कोठेकर व साधना काळे, काँग्रेसकडून विशाल पावडे यांची निवड अविरोध पार पडली. या प्रक्रियेत नागरिकांमध्ये समाधान दिसून आले, तर महिला सभापतींच्या नेतृत्वामुळे नगरपरिषदेतील निर्णय अधिक संवेदनशील आणि नागरिकाभिमुख होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

भाजपने सुरुवातीला शहर विकास आघाडी स्थापन केली, ज्यात बसपा, प्रहार आणि अपक्ष नगरसेवकांचा सहभाग होता. त्यामुळे भाजपचे संख्याबळ ३२ झाले होते. महायुतीत शिंदेसेनेचा सहभाग झाल्यामुळे बहुमत ३९ वर पोहोचले, आणि नगराध्यक्ष भाजपच्या असण्यामुळे सभागृहातील ४० सदस्यांचा बहुमत कायम राहिला. यामुळे नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके यांना सत्ता संतुलन राखून निर्णय घ्यावे लागणार आहे. शहर विकास, पाणीपुरवठा, स्वच्छता, महिला-बाल कल्याण तसेच शिक्षण आणि आरोग्य यांसारख्या महत्त्वाच्या समित्यांवर महिलांचे नेतृत्व असणे हा नागरिकांसाठी सकारात्मक संदेश ठरतो. या निवड प्रक्रियेमुळे नगरपरिषदेत महिला सक्षमीकरणाचा आदर्श साकार होताना दिसतो, तसेच निर्णय प्रक्रियेत समावेश वाढण्याची संधी निर्माण झाली आहे. या सभापती निवडीच्या प्रक्रियेत पीठासीन अधिकारी उपविभागीय अधिकारी गोपाळ देशपांडे व मुख्याधिकारी शुभम क्यातवार उपस्थित होते. नगराध्यक्ष प्रियदर्शनी उईके व उपाध्यक्ष दत्ता कुळकर्णी यांनी नव्याने निवडलेल्या सभापतींचे स्वागत केले, तर कार्यकर्त्यांनी जल्लोष साजरा केला.

# उमरखेड नगरपरिषदच्या उपाध्यक्षपदी जुबेर कुरेशी

## स्वीकृत सदस्य म्हणून गोपाल अग्रवाल व बाळासाहेब नाईक यांची निवड

प्रतिनिधी १७ जानेवारी

**उमरखेड :** उमरखेड नगरपरिषदेत जनशक्ती पॅनलच्या ऐतिहासिक विजयानंतर पहिली अधिकृत बैठक उत्साहात पार पडली. या बैठकीत जुबेर कुरेशी यांची उपाध्यक्षपदी निवड झाली, तर गोपाल अग्रवाल आणि बाळासाहेब नाईक यांना स्वीकृत सदस्य म्हणून निवड करण्यात आली.



निवडणुकीत जनशक्ती पॅनलने एकमताने बहुमत मिळवले, तर भाजपने आपले उम्मीदवार दाखल करून थोडासा वाद निर्माण करण्याचा प्रयत्न केला. तथापि, जनशक्ती पॅनलच्या ताकदीच्या आधारावर जुबेर कुरेशी यांचा ९ मतांनी विजय झाला. या निवडीला नगरपरिषद अध्यक्ष तेजश्री जैन आणि सहायक सीईओ डॉ. अजय कुरवाडे यांच्या पिठासीनतेखाली अधिकृत मान्यता देण्यात आली. स्वीकृत सदस्यांच्या निवडीमध्ये, जनशक्ती पॅनलने गोपाल अग्रवाल व बाळासाहेब नाईक यांची निवड केली, तर भाजपकडून विजय गुजरे यांचे नावही निश्चित करण्यात आले. निवड झाल्यावर नगरपरिषद परिसरात फटाके व बँडच्या गजरात जल्लोष साजरा करण्यात आला. समर्थकांनी नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांचे पुष्पहार घालून स्वागत केले करुन आनंद व्यक्त केला. यावेळी जनशक्ती पॅनलचे प्रमुख, काँग्रेसचे नेते तातू देशमुख, शहराध्यक्ष नंदकिशोर अग्रवाल, एड. संतोष जैन, तालुकाध्यक्ष दत्तराव शिंदे, शिंदेसेनेचे गजेंद्र ठाकरे आदी प्रमुख नेत्यांची उपस्थिती होती.

# ट्रॅक्टरच्या धडकेत दुचाकीस्वार ठार

प्रतिनिधी १७ जानेवारी

**यवतमाळ :** ग्रामीण पोलीस ठाण्याच्या हद्दीत साकूर फाट्याजवळ भरधाव व निष्काळजी ट्रॅक्टरने दुचाकी वाहनाला जोरदार धडक दिल्याने तरुणाचा जागीच मृत्यू झाला. ही घटना १५ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता घडली. रामनगर (बोरी गोसावी) येथील राजु भारत गीरी (२५) शेतातून घरी परतत असताना अपघात झाला. गंभीर जखमी झालेल्या राजुचा उपचारापूर्वीच मृत्यू झाला. घटनेनंतर चालक फरार असून, मृतकाचा भाऊ सतीष गीरी यांच्या फिर्यादीवरून ट्रॅक्टर चालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गावात शोककळा पसरली आहे.

# आर्णी नगरपरिषदेतील विविध समित्यांवर सभापतींची निवड

प्रतिनिधी १७ जानेवारी

**आर्णी :** आर्णी नगरपरिषदेतील विविध समित्यांवर सभापतींची निवड प्रक्रिया दुपारी तीनच्या सुमारास पार पडली. ही प्रक्रिया उमरखेड येथील उपविभागीय अधिकारी सखाराम मुळे आणि मुख्याधिकारी रवींद्र राऊत यांच्या उपस्थितीत पार पडली. नगरपरिषदेतील सत्ता संतुलन लक्षात घेता, राष्ट्रवादी, शिंदेसेना, भाजप आणि उबाठा पक्षांना समित्यांवर सभापतीपदी प्रतिनिधित्व देण्यात आले. बांधकाम समिती सभापती म्हणून अंजलीताई खंदार (राष्ट्रवादी), आरोग्य समिती सभापती अनवर पठाण (राष्ट्रवादी),



शिक्षण समिती सभापती संजय व्यव्हारे (राष्ट्रवादी), पाणीपुरवठा समिती सभापती छबुताई चारोडे (शिंदेसेना), महिला व बालकल्याण समिती सभापती चैताली देशमुख (भाजप), महिला व बालकल्याण उपसभापती शीतल प्रवीण काळे (उबाठा) यांची निवड करण्यात आली. या निवडीत नगराध्यक्ष नालंदा भरणे (काँग्रेस) व उपनगराध्यक्ष निलेश गावंडे (शिंदेसेना) यांचा मार्गदर्शनाचा वाटा होता. यावेळी राष्ट्रवादीचे नेते साजिद बेग, काँग्रेसचे नेते अरीज बेग मिर्झा, शिंदेसेनेचे जिल्हा उपाध्यक्ष विष्णू उकंडे, भाजपचे तालुका अध्यक्ष रवींद्र राठोड आणि राष्ट्रवादी तालुका अध्यक्ष सुनिल पोतगंटवार तसेच प्रमुख कार्यकर्ते उपस्थित होते.

# सत्कारांचे कार्यक्रम कधी संपणार?

## प्रत्यक्ष विकासकामांना कधी गती मिळणार? : जनतेचा सवाल

प्रतिनिधी १७ जानेवारी

**यवतमाळ :** नगरपरिषद निवडणुकीनंतर नवनिर्वाचित नगराध्यक्ष व नगरसेवकांचे सत्कार, अभिनंदन व गौरव समारंभ मोठ्या उत्साहात सुरू आहेत. मात्र हे सत्काराचे कार्यक्रम नेमके कधी संपणार आणि शहराच्या प्रत्यक्ष प्रश्नांवर कामाला कधी सुरुवात होणार, असा थेट सवाल आता यवतमाळकर जनता उपस्थित करत आहे.

शहरातील अनेक भागांमध्ये रस्त्यांची दुरवस्था, पाणीपुरवठ्याची अनियमितता, सांडपाणी व स्वच्छतेचे प्रश्न, अतिक्रमण, पथदिवे, आरोग्य व शिक्षणाशी संबंधित समस्या दिवसेंदिवस गंभीर होत आहेत. निवडणूक प्रचारादरम्यान दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी कधी सुरू होणार, याकडे नागरिकांचे लक्ष लागले आहे. नवनिर्वाचित लोकप्रतिनिधींनी पदभार स्वीकारून समित्यांची स्थापना, विकासकामांचा आराखडा आणि तातडीच्या प्रश्नांवर निर्णय घेणे अपेक्षित आहे. मात्र सत्कार व समारंभांमध्येच वेळ जात असल्याची भावना सर्वसामान्य नागरिकांमध्ये निर्माण झाली आहे.

जनतेला फोटोसेशन आणि कार्यक्रम नकोत, तर रस्ते, पाणी, स्वच्छता, आरोग्य व विकासकामे हवी आहेत. आता वेळ सत्कारांचा नाही, तर जबाबदारीने कामाला लागण्याचा आहे. लोकांनी विश्वासाने दिलेला कौल विकासासाठी वापरावा, अशी ठाम मागणी यवतमाळकर नागरिकांकडून होत आहे.

# पुसद येथे देशी कट्टा बाळगणारा तरुण ताब्यात

प्रतिनिधी १७ जानेवारी

**पुसद :** पुसद शहरात अवैध धंद्यांविरोधात सुरू असलेल्या कारवाईदरम्यान पोलिसांनी गावठी बनावटीचा देशी कट्टा बाळगणाऱ्या १८ वर्षीय तरुणाला ताब्यात घेतले आहे.

सहाय्यक पोलीस अधीक्षक व उपविभागीय पोलीस अधिकारी, पुसद यांच्या आदेशानुसार शहर पोलीस ठाण्याचे पथक पेट्रोलिंग करत होते. दरम्यान, छत्रपती शिवाजी वार्ड येथून गुप्त माहिती मिळाली की, एक तरुण



गावठी बनावटीचा देशी कट्टा बाळगून शहरातील रस्त्यावर फिरत आहे. मिळालेल्या माहितीनुसार महिला पोहवा मनिषा वाघमारे, पो.कॉ. नरेश नरवाडे, पो.कॉ. सौरभ लोखंडे, पो.कॉ. पराग गिरनाळे, नापोका प्रशांत स्थुल व महिला पो.कॉ. कल्पना रबडे यांनी दोन पंचांसह घटनास्थळी धाव घेतली. चौकशी दरम्यान संशयिताने आपले नाव शेख समद शेख पाशु (वय १८, रा. डोगरगाव, ता. महागाव, जि. यवतमाळ) असल्याचे सांगितले. त्याच्या अंगझडतीत अंदाजे १०,००० रुपये किमतीचा गावठी बनावटीचा देशी कट्टा जप्त करण्यात आला. या प्रकरणी आरोपीविरुद्ध पोलीस स्टेशन पुसद शहर येथे अप.क्र. २८/२०२६, कलम ३/२५ भारतीय हत्यार कायदा अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक कुमार चिंतामणी, अपर पोलीस अधीक्षक अशोक थोरा, सहाय्यक पोलीस अधीक्षक हर्षवर्धन बिजे यांच्या मार्गदर्शनाखाली, ठाणेदार पोलीस निरीक्षक सेवानंद वानखडे यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक ठोमरे करीत आहेत.

# आगीमुळे दुकान जळले तरी विमा दावा नाकारला

## ५ लाख रुपये भरपाई देण्याचे आदेश; ग्राहक आयोगाचा दणका

प्रतिनिधी १७ जानेवारी

**यवतमाळ :** पुसद येथील सय्यद लियाकत अली सय्यद उस्मान अली यांच्या स्मार्ट इलेक्ट्रॉनिक्स या दुकानाला २९ जून २०२० रोजी शॉर्ट सर्किटमुळे भीषण आग लागली. या आगीत दुकानातील संपूर्ण माल जळून खाक झाला, तरीही बजाज अलायन्स जनरल इन्शुरन्स कंपनीने विमा दावा नाकारला. कंपनीने खरेदीची बिले व इतर आवश्यक कागदपत्रे जळून गेल्याचे कारण मान्य न करता दावा नामंजूर केला, ज्यामुळे तक्रारदाराने यवतमाळ जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाचा दरवाजा ठोकला.

आयोगाचे अध्यक्ष डॉ. रविंद्र उल्हास मराठे व सदस्या अमृता वैद्य यांच्या उपस्थितीत सुनावणी झाली. सुनावणी दरम्यान दुकानातील सर्व साहित्य आगीत जळून गेले असल्याचे स्पष्ट असतानाही विमा कंपनीकडून अडथळे निर्माण केल्याचे निदर्शनास आले. आयोगाने ठरवले की, विमा संरक्षित दुकानाला आग लागून नुकसान झाले असतानाही भरपाई न देणे ही अनुचित व्यापार पद्धत आहे. आयोगाने तक्रारदारास रु. ५,००,०००/- नुकसानभरपाई व त्यावर २९/०६/२०२० पासून प्रत्यक्ष रक्कम अदा होईपर्यंत ८% वार्षिक व्याज देण्याचे आदेश दिले. तसेच मानसिक व शारीरिक त्रासासाठी १०,०००/- रुपये देण्याचेही आदेश आले. या प्रकरणात तक्रारदाराच्या वतीने ॲड. मोहम्मद शहेबाज मोहम्मद एजाज यांनी प्रभावी युक्तिवाद केला, ज्यामुळे विमा कंपनीच्या मनमानी कारभाराला चाप बसला आणि तक्रारदारास न्याय मिळाला.

# घाटंजी नगरपरिषदेत भाजपचे वर्चस्व कायम

प्रतिनिधी १७ जानेवारी

**घाटंजी :** घाटंजी नगरपरिषद निवडणुकीनंतर सुरू झालेल्या सत्तास्थापना प्रक्रियेत भाजपने विषय समित्यांवरही आपले वर्चस्व प्रस्थापित केले आहे. पाच सभापती आणि एका उपसभापतीपदासाठी झालेल्या निवड प्रक्रियेत सर्व पदे भाजपच्या नगरसेवकांनी पटकावली. काँग्रेसकडे पुरेसे संख्याबळ नसल्याने त्यांना एकाही समितीत प्रतिनिधित्व मिळू शकले नाही.

सार्वजनिक बांधकाम व नियोजन समितीच्या सभापतिपदी विश्वास राऊत, आरोग्य समितीच्या सभापतिपदी उपाध्यक्ष सोनल ठाकरे, तर पाणीपुरवठा समितीच्या सभापतीपदी गटनेते गोपाल काळे यांची बिनविरोध निवड झाली. महिला व बालकल्याण उपसभापतीपदी भारती कुंटलवार यांची बिनविरोध निवड जाहीर करण्यात आली. शिक्षण समितीच्या सभापतिपदासाठी झालेल्या निवडणुकीत भाजपचे रवी भोजवार यांनी काँग्रेसच्या सैय्यद खालिदा तबस्सुम रमीज यांचा ३–२ अशा मतांनी पराभव केला. महिला व बालकल्याण सभापतीपदासाठी काँग्रेसचे अर्ज बाद व माघार घेतल्याने भाजपच्या नम्रता मेश्राम यांची



बिनविरोध निवड झाली. या निवड प्रक्रियेदरम्यान उपविभागीय अधिकारी सुधीर पाटील पीठासीन अधिकारी म्हणून उपस्थित होते. यावेळी मुख्याधिकारी राजू घोडके व हरीश पाटील उपस्थित होते.

# अकोली खुर्द शाळेत शैक्षणिक व सामाजिक उपक्रम

प्रतिनिधी १७ जानेवारी

**यवतमाळ :** जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा, अकोली खुर्द येथे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध शैक्षणिक आणि सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष मुरलीधर भिडकर तर प्रमुख अतिथी तंटामुक्ती समितीचे अध्यक्ष नामदेवराव वानखडे उपस्थित होते.

या प्रसंगी जिल्हा परिषद कर्मचारी पतसंस्था क्र. १०९च्या संचालक विजया राऊत (मलकापूरे) यांनी शाळेसाठी डायस भेट दिला. आरोग्य सेविका राऊत मॅडम यांनी विद्यार्थ्यांना आरोग्य, स्वच्छता आणि दैनंदिन काळजीबाबत मार्गदर्शन केले.

सर्पमित्र अनिकेत कोहचाडे, सुमित डंभारे, स्वप्निल शस्त्रकार व गजानन



मडावी यांनी विद्यार्थ्यांना विषारी व बिनविषारी साप ओळखण्याचे प्रत्यक्ष प्रशिक्षण दिले. त्यांनी सापांच्या अन्नसाखळीत महत्त्व, शेतकऱ्यांसाठी उपयोगिता आणि साप चावल्यावर प्राथमिक उपचार कसे करावे याबाबत माहिती दिली.

अध्यक्ष मुरलीधर भिडकर यांनी शिक्षकांच्या प्रयत्नांचे कौतुक करत शैक्षणिक आणि सहशालेय उपक्रमांची सांगड आवश्यक असल्याचे सांगितले. अविनाश काकडे सर यांनी "मुख्यमंत्री माझी शाळा" आणि "सुंदर शाळा" उपक्रमांतर्गत शाळेने जवळजवळ सर्व निकष पूर्ण केल्याची माहिती दिली. शाळेला भेट दिल्याबद्दल विजया राऊत (मलकापूरे) यांचा शाल व श्रीफळ देऊन सत्कार करण्यात आला. तसेच सर्पमित्रांचा मान्यवरांच्या हस्ते सत्कार झाला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक अविनाश काकडे सर यांनी केले, तर आभार सुझिता बोंद्रे यांनी मानले. कार्यक्रमास मुख्याध्यापक अशोक तालकोकुलवार, अविनाश काकडे, सुरेश वाकडे, सुचिता बोंद्रे, विजय मलकापूरे, सोमेश्वर पौनीकर आदी उपस्थित होते.

# बाभुळगाव येथे तीन दिवसीय धम्म परिषद

प्रतिनिधी १७ जानेवारी

**बाभुळगाव :** येथील भदंत आनंद समता परिसरात आयोजित अठराव्या तीन दिवसीय धम्म परिषदेची सांगता रविवारी झाली. समारोप कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गोपाळ मनवर होते. कार्यक्रमाचे प्रास्ताविक धर्मपाल माने यांनी केले, तर सूत्रसंचालन प्रफुल सोनटक्के यांनी केले.

या परिषदेप्रसंगी पाली भाषा अभ्यासक प्रा. डॉ. चित्रा नितीश मात्रे, नितीश मात्रे (मुंबई), प्रा. डॉ. चंद्रकांत सरदार (शिवशक्ती कला व वाणिज्य महाविद्यालय, बाभुळगाव), ॲड. हार्दिक डबले (मुंबई उच्च न्यायालय), जयेंद्र बारसे (राजनांदगाव), आनंद भगत (सेवानिवृत्त पोलीस निरीक्षक, यवतमाळ) यांच्यासह विजय



डांगे, विजय भितकर, रवी श्रीरामे, राजू बनसोड, जय वाघमारे, शशांक इंगोले, पराग पिसे, दिलीप वाघमारे, सुधाकरराव गडलिंग, संजय तिरपुडे, सिद्धार्थ दातार, सम्राट बनसोड, रत्नपाल टोपे, प्रकाश भस्मे, महेंद्र खडसे, अक्षय राऊत, प्रा. सतीश मेश्राम, उत्तमराव मनवर आदी मान्यवर उपस्थित होते.

सायंकाळी नागपूरच्या अंजली भारती व त्यांच्या संचाने सादर केलेल्या भीमगीतांच्या कार्यक्रमाला श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

परिषदेच्या यशस्वी आयोजनासाठी प्रमुख आयोजन समिती, कार्यक्रम आयोजन समिती, महिला कार्यकारिणी तसेच धम्मसेवेत कार्यरत उपासक-उपासिका यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

आयोजकांच्या वतीने सर्व सहकाऱ्यांचे आभार मानण्यात आले. आभार प्रदर्शन प्रा. प्रफुल सोनटक्के व राजू बनसोड यांनी केले.

# मराठवाड्यातील आमदारांचा विदर्भातील शेतकऱ्याला मदतीचा हात

## मुख्यमंत्री सहायता निधीतून एक लाखांची आर्थिक मदत

प्रतिनिधी १७ जानेवारी

**पुसद :** समाजकारणाला प्राधान्य देत संकटात सापडलेल्या गरिबांच्या मदतीला धावून जाणारे नेतृत्व आजच्या राजकारणात दुर्मिळ झाले आहे. अशाच समाजाभिमुख भूमिकेचे दर्शन मराठवाड्यातील कळमनुरी मतदारसंघाचे आमदार संतोष बांगर यांनी घडविले आहे.

आमदार बांगर यांनी विदर्भातील शेंबाळ पिंपरी येथील अल्पभूधारक शेतकरी सुभाषराव बैस यांना मुख्यमंत्री सहायता निधीतून एक लाख रुपयांची आर्थिक मदत दिली आहे. या मदतीमुळे गंभीर आजाराशी झुंज देणाऱ्या शेतकरी कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे.



सुभाषराव बैस यांच्याकडे अवघी तीन एकर शेती आहे. गेल्या चार वर्षांपासून सततच्या अतिवृष्टीमुळे खरीप हंगामात अपेक्षित उत्पादन मिळाले नाही. त्यामुळे शेतीवरील खर्चही न निघाल्याने त्यांची आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट झाली होती.

यातच अनेक वर्षांपासून कंबरदुखीचा तीव्र त्रास असल्याने वैद्यकीय तपासणीत कंबरेचा बॉल खराब झाल्याचे निष्पन्न झाले. शस्त्रक्रियेसाठी दोन ते अडीच लाख रुपयांचा खर्च अपेक्षित होता. मात्र आर्थिक अडचणींमुळे उपचार करणे अशक्य झाले होते.

दरम्यान, वाकोडी येथील उपसरपंच बालाजीराव सुरवसे यांच्याशी झालेल्या भेटीत बैस यांनी आपली व्यथा मांडली. सुरवसे यांनी पुढाकार घेत आमदार संतोष बांगर यांची हिंगोली येथे भेट घडवून दिली. संपूर्ण माहिती समजताच आमदार बांगर यांनी तत्काळ मुख्यमंत्री सहायता निधीतून मदत मंजूर केली.

या निधीतून नांदेड येथील खासगी रुग्णालयात बैस यांच्यावर यशस्वी शस्त्रक्रिया करण्यात आली असून सध्या त्यांची प्रकृती ठणठणीत आहे. आमदार बांगर यांच्या या माणुसकीच्या भूमिकेचे ग्रामस्थांकडून कौतुक होत आहे.

५ सिटी न्यूज सुपरफास्ट वाशीम
शनिवार दि. १७ जानेवारी २०२६ http://epaper.citynewssuperfast.com

## सिकलसेलमधून होणार मुक्ती, अरूणोदय मोहिमेची युक्ती..!




वाशिम, दि. १५ जानेवारी (जिमाका) : सिकलसेल हा आजार केवळ वैद्यकीय प्रश्न नसून तो सामाजिक जाणीवेशीही निगडित आहे. योग्य माहिती, वेळेवर तपासणी आणि समाजाची सक्रिय भागीदारी यामुळेच सिकलसेलमुक्त पिढी घडवता येईल. यासाठी जनजागृती हाच सिकलसेलमुक्त भविष्यासाठी खरा गाभा आहे, असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले. महाराष्ट्र शासनाच्या 'अरुणोदय – सिकलसेलमुक्त भविष्यासाठी' या विशेष अभियानाच्या पार्श्वभूमीवर वाशिम जिल्ह्यात विविध स्तरांवर व्यापक जनजागृती उपक्रम राबविण्यात येत आहेत. १५ जानेवारी ते ७ फेब्रुवारी २०२६ या कालावधीत तपासणी शिबिरे, मार्गदर्शन सत्रे व समुपदेशन कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या कार्यक्रमास जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. अनिल कावरखे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. पी. एस. ठोंबरे, अतिरिक्त जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. विजय काळे, बाह्यसंपर्क वैद्यकीय अधिकारी डॉ. पराग राठोड, बालरोग तज्ज्ञ डॉ. बगाडे, , तसेच बाकलीवाल महाविद्यालय येथील एनसीसी अधिकारी अमोल काळे आदींची

# ठेकेदार जोमात, शेतकरी कोमात !




## कोयाळी जाधव येथील पुलाचे प्रकरण * लोकप्रतिनिधींनी लक्ष देण्याची गरज

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •










जिल्ह्यातील रिसोड तालुक्यात येत असलेल्या कोयाळी जाधव येथील अल्पभूधारक शेतकरी मोहन बबन जाधव या गरीब शेतकऱ्याने न्याय मिळावा म्हणून प्रशासनाकडे तक्रार केली आहे. मात्र सदर प्रकरणात प्रशासनाकडून अद्यापही दखल घेण्यात आलेली नाही. परिणामी सबंधित ठेकेदार जोमात, अन् शेतकरी मात्र कोमात असे वास्तव समोर येत आहे. या गंभीर बाबीकडे स्थानिक लोकप्रतिनिधी सुद्धा मूग गिळून गप्प असल्याने गरिबाने न्याय मागायचा कोणाकडे ? असा प्रश्न उपस्थित होत आहे. पितृछत्र हरवलेला हा अत्यल्पभूधारक युवा शेतकरी बेरोजगार असून विधवा आईसह आपली नाममात्र ४८ गुंठे जमीन वाचावी यासाठी प्रशासनाकडे केविलवाणी विनंती करीत आहेत. ज्याचा धनी नाही पास, त्याचा सत्यानाश! असा शाप लागलेले हे दोन मायलेक आज जमिनीचा तुकडा वाचविण्यासाठी दारोदार फिरत आहेत. ही बाब लोकशाही व्यवस्थेसाठी खुप लाजिरवाणी ठरत आहे. त्यामुळे किमान स्थानिक आमदार, खासदार महोदयांनी तरी या गंभीर प्रकाराची दखल घ्यावी अशी अपेक्षा हे निराधार मायलेक व्यक्त करीत आहेत.

हाती आलेल्या माहितीनुसार, कोयाळी जाधव ते नेतन्सा, डोणगाव सीमेपर्यंत प्रधानमंत्री ग्राम सडक योजनेतून रस्त्याचे काम पूर्ण झाले आहे. मात्र कोयाळी जवळ असलेल्या एका नाल्यावर जो पूल बांधण्यात आला आहे तो आराखड्याशी विसंगत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. तसेच सदर ठिकाणी प्रस्तावित रस्ता जाणीवपूर्वक अंदाजपत्रकाराला बगल देऊन वळविण्यात आला असल्याचा आरोप सुद्धा करण्यात येत आहे. यात चिरीमिरी घेऊन एका निराधार विधवा महिला शेतकऱ्यावर अन्याय करण्यात आला असल्याची चर्चा कोयाळी येथील नागरिक करत आहेत. सदर चर्चेनुसार कोयाळी जाधव येथील स्व. बबन जाधव हे व्यसनाधीन असल्याने त्यांच्या दुर्लक्षामुळे ही गंभीर बाब उजागर होण्यास विलंब झाला असल्याची माहिती समोर येत आहे. मात्र त्यांच्या दुःखद निधनानंतर विधवा पत्नी व मुलगा मोहन बबन जाधव हे मायलेक न्याय मिळवण्यासाठी शासनदरबारी वाऱ्या करत आहेत. वडिलोपार्जित असलेल्या केवळ ४८ गुंठ्यातील काही गुंठे जमीन रस्ता आणि पुलाच्या कामात गेला तर उपजीविका करायची कशी ? हा गंभीर प्रश्न या मायलेकरांसमोर निर्माण झाला आहे.

विशेष बाब म्हणजे, सदर रस्ता व पूल आराखडा आणि अंदाजपत्रकानुसार त्यांच्या शेतातून असता तर एक वेळ त्यांनी आपल्या नशिबाला दोष देत सदर बाब सहन केली असती. मात्र जाणीवपूर्वक मोडक्या काठीवर घाव करण्यात आला असल्याची माहिती समोर येत आहे. हा एका निराधार व दरिद्रीरेषेखाली जगत असलेल्या कुटुंबावर अन्याय असल्याचे कोयाळी येथील ग्रामस्थ बोलत आहेत. आपल्यावरील या गंभीर अन्यायाला वाचा फोडण्यासाठी मोहन जाधव हा युवा बेरोजगार वाशिम येथील वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या कार्यालयाचे उंबरठे झिजवत आहे. मात्र अद्याप त्याला कोठूनही प्रतिसाद मिळाला नाही. तर सबंधित विभागातील अधिकाऱ्यांनी त्याच्या तक्रारीची कुठलीही दखल घेतली नाही. त्याच्या ४८ गुंठ्यात पहिलाच एक नैसर्गिक नाला आहे. त्यातच जाणीवपूर्वक पूल व रस्त्याचे काम वळविण्यात आल्याने उरलेल्या गुंठ्यात जगायचे कसे ? हा गंभीर प्रश्न उभा ठाकला आहे. माझ्यावर झालेल्या या गंभीर अन्यायाला न्याय मिळवून देण्यासाठी स्थानिक आमदार, खासदार व पुढाऱ्यांनी प्रयत्न करावेत अशी अपेक्षा मोहन बबन जाधव यांनी प्रस्तुत प्रतिनिधींशी बोलतांना व्यक्त केली आहे.

## थोडक्यात

### माजी सैनिक व्यवहारे बंधूंची क्रिडा स्पर्धेत उत्कृष्ट कामगिरी




• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

महाराष्ट्र मास्टर्स ॲथलेटिक्स असोसिएशनने आयोजित केलेल्या क्रिडा स्पर्धेत येथील माजी सैनिक व्यवहारे बंधूंनी उत्कृष्ट खेळाचे प्रदर्शन करून आयोजक व प्रेक्षकांची वाहवा मिळविली .

स्थानिक क्रिडा संकुलावर महाराष्ट्र मास्टर्स ?थलेटीक्स असोसिराशनने क्रिडा स्पर्धेचे आयोजन केले होते . यामध्ये गोळा फेक आणि थाली फेक या क्रिडा प्रकारात ७५ वर्षे वयोगटात माजी सैनिक गोविंद रामजी व्यवहारे यांनी गुणानुक्रमे रजत पदक व ब्रांझ पदक प्राप्त करून बाजी मारली . तसेच त्यांचे धाकटे बंधू माजी सैनिक सतीश रामजी व्यवहारे यांनी माजी सैनिक व वरिष्ठ नागरीक गटात वेगाने चालणे आणि भालाफेक क्रिडा प्रकारात रजत पदक प्राप्त केले . विशेष म्हणजे या दोन्ही माजी सैनिकांचे ज्येष्ठ बंधू व १९७१ च्या भारत - पाक युद्धात जखमी झालेले माजी सैनिक शारिरीक अपंगत्वामुळे क्रिडा स्पर्धेत भाग घेवू शकले नाहीत . या यशाबद्दल व्यवहारे बंधूचे सर्वत्र कौतुक होत आहे . यामध्ये गोळा फेक आणि थाली फेक या क्रिडा प्रकारात ७५ वर्षे वयोगटात माजी सैनिक गोविंद रामजी व्यवहारे यांनी गुणानुक्रमे रजत पदक व ब्रांझ पदक प्राप्त करून बाजी मारली . तसेच त्यांचे धाकटे बंधू माजी सैनिक सतीश रामजी व्यवहारे यांनी माजी सैनिक व वरिष्ठ नागरीक गटात वेगाने चालणे आणि भालाफेक क्रिडा प्रकारात रजत पदक प्राप्त केले . विशेष म्हणजे या दोन्ही माजी सैनिकांचे ज्येष्ठ बंधू व १९७१ च्या भारत - पाक युद्धात जखमी झालेले माजी सैनिक शारिरीक अपंगत्वामुळे क्रिडा स्पर्धेत भाग घेवू शकले नाहीत .

### कृषी अधिकाऱ्याची फालतुगिरी, बळीराजावर दादागिरी...

# खोट्या लाभार्थ्यांना अनुदान, खऱ्या लाभार्थ्याला मारहाण !

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •






**जिल्ह्यात राबविण्यात आलेल्या नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोकरा या योजनेतील कथित गैरप्रकाराने जिल्ह्यात खळबळ उडवून दिली आहे. रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील एका शेतकऱ्याने केलेल्या तक्रारीतून पोखरा योजनतील गैरप्रकार संपूर्ण जिल्ह्यात चर्चेचा विषय ठरत आहे. परिणामी कृषी विभागाच्या पारदर्शकतेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. पोखरा घोटाळा फसवेगिरीतून पैसा गेला गोळा ! अशा चर्चेला उधाण आले असतांनाच, मंगरूळपीर तालुका कृषी अधिकाऱ्याने फळबागेचे अनुदान मागणाऱ्या एका शेतकऱ्याला चक्क बुटाने मारहाण केली असल्याची चित्रफित राज्यभर धुमाकूळ घालत आहे. या धक्कादायक व लांच्छनास्पद घटनेने आणि गाजत असलेल्या शेलुखडसे येथील पोकरा गैरप्रकाराने कृषी विभागाची लक्तरे वेशीवर टांगली जात आहेत. या दोन्ही प्रकरणातील सखोल चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करावी अन्यथा राज्यभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा अनेक शेतकरी संघटनांनी दिला आहे. तर कृषी अधिकाऱ्याची फालतुगिरी अन् बळीराजावर दादागिरी! असा संदेश सर्वत्र पसरल्याने शेतकरी वर्गात संतापाची लाट उसळली आहे.**

रिसोड तालुक्यातील शेलुखडसे येथील शेतकरी वसंत खडसे यांनी नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प अर्थात पोखरा योजनेमधील गैरप्रकाराची तक्रार थेट राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. या तक्रारीत वसंत खडसे यांनी अनेक मुद्दे उपस्थित करत सरकारचे व प्रशासनातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचे लक्ष वेधून घेतले आहे. यात कुठलीही फळबाग लागवड न करता एकाच कुटुंबातील तेही पती आणि पत्नीच्या नावावर घेतलेले लाखों रुपयांचे फळबागेचे अनुदान हा मुद्दा विशेष लक्षवेधी ठरत आहे. परिणामी या गंभीर तक्रारीची दखल घेत मुख्यमंत्री कक्ष जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम यांनी या प्रकरणी चौकशी सुरू केली आहे. त्या अनुषंगाने तपास अधिकारी म्हणून अनिल राठोड यांनी प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली आहे. शिवाय तक्रारीतील ईतर मुद्द्यांची बारकाईने पाहणी करून पुराव्यातील कागदपत्रे व ईतर गोपनीय चौकशी अहवाल वरिष्ठांकडे पाठविला असल्याची माहिती सूत्रांनी दिली आहे. शेलुखडसे येथील विवादित पोकरा तक्रारीमुळे रिसोड तालुक्यातील मोप, लोणी, मोरगव्हाण, भर जहाँगीर व ईतर पोखरा भाग - १ मध्ये समाविष्ट असलेल्या अनेक गावतून आता नवनव्या तक्रारी उजागर होत आहेत. त्यामुळे तालुका कृषी अधिकारी, कृषी पर्यवेक्षक, कृषी सहाय्यक आणि सबंधित दलालांची पाचावर धारण बसली आहे. ' खाली पडलेले शेण ' आता माती घेऊन उठणार! या भीतीने तालुका कृषी विभागात एकच सन्नाटा पसरला आहे.

स्वतःच्या आर्थिक स्वार्थापोटी प्रशासनातील अधिकारी व कर्मचारी एका महत्वाकांक्षी योजनेचा कसा बट्ट्याबोळ करून टाकतात हे या आधीच्या पोकरा मधील तक्रारीतून सिद्ध झाले आहे. त्यामुळे वाशिम मधील या गंभीर प्रकरणाकडे केवळ जिल्ह्याचेच नव्हे; तर संपूर्ण राज्याचे लक्ष वेधले जात आहे. प्राथमिक चौकशी अहवाल वरिष्ठांकडे गेला असला तरी कारवाई काय होईल? की सर्वांचेच हात ओले असल्याने थातुरमातुर चौकशी करून प्रकरण दडपण्यात येईल ? असे अनेक प्रश्न उपस्थित केले जात असताना मंगरूळपीर तालुक्यातील गोगरी येथील शेतकरी ऋषिकेश पवार यांना एका तालुका कृषी अधिकाऱ्याने केलेली मारहाण हा कृषी विभागासाठी लांच्छनास्पद मुद्दा नव्याने ऐरणीवर आला आहे.

एकीकडे कृषी विभागाचे अधिकारी व कर्मचारी पोकरा सारख्या बहुआयामी योजनेतून केवळ स्वार्थापोटी लाभ न घेतलेल्या लाभार्थ्यांना अर्थात शेलुखडसे येथील उदाहरण पहा ! कुठल्याही फळाचे एक झाडं ही न लावता फळबाग लागवड योजनेखाली लाखों रुपयांचे अनुदान हडपले. तर दुसरीकडे गोगरी येथील शेतकरी यांनी मनरेगा योजनेतून जवळपास तीन एकर बाग फुलविली त्याला अनुदान ऐवजी मारहाण करण्यात आली. हा प्रकार केवळ राज्यासाठी नव्हे; तर कृषिप्रधान असलेल्या आपल्या देशाची मान खाली घालवणारा तर आहेच, मात्र शेतकऱ्यांच्या नावावर मतांचा जोगवा मागत सत्तेचे सिंहासन काबीज करणाऱ्यांसाठी सुद्धा तितकाच लज्जास्पद आहे.




# महिलांच्या उद्यमशीलतेला चालना देणार -जिल्हाधिकारी

## उमेदच्या माध्यमातून महिलाशक्तीचे उद्यमी रूप; जिल्हास्तरीय तीन दिवसीय प्रदर्शनीचे थाटात उद्‌घाटन

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •

महिला बचत गट हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचे मजबूत आधारस्तंभ आहेत. महिलांनी एकत्र येऊन सुरू केलेले उद्योग केवळ त्यांच्या कुटुंबांचेच नव्हे, तर संपूर्ण गावाच्या आर्थिक प्रगतीला गती देतात. उमेद अभियानाच्या माध्यमातून महिलांना आर्थिक स्वावलंबनाची संधी मिळत असून प्रशासन त्यांना सातत्याने सहकार्य करीत आहे. महिला बचत गटांनी गुणवत्ता, उद्दिष्टे आणि नाविन्यता यावर भर दिल्यास त्यांची उत्पादने केवळ जिल्हास्तरावरच नव्हे तर राज्य व राष्ट्रीय पातळीवरही ओळख निर्माण करतील. जिल्हा प्रशासन महिला उद्योजिकांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून त्यांचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य भविष्यातही करण्यात येईल. असे प्रतिपादन जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांनी केले.



उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत महिला बचत गटांनी उत्पादित केलेल्या विविध वस्तूंच्या तीन दिवसीय जिल्हास्तरीय प्रदर्शनाचे उद्‌घाटन जिल्हा क्रीडा संकुल येथे मोठ्या उत्साहात पार पडले. यावेळी जिल्हाधिकारी श्री. कुंभेजकर बोलत होते. ग्रामीण महिलांच्या कष्टातून साकारलेल्या उत्पादनांना बाजारपेठ उपलब्ध करून देणे व त्यांचे आर्थिक सबलीकरण साधणे हा या प्रदर्शनाचा मुख्य उद्देश आहे. उद्‌घाटनप्रसंगी व्यासपीठावर जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर, विधानसभा सदस्य आ. श्याम खोडे, विधानपरिषद सदस्य आ. किरणराव सरनाईक, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे, मालेगाव गटविकास अधिकारी आकाश वर्मा, गटविकास अधिकारी रवींद्र सोनवणे, संजय मापारी, ॲड. गंगावणे, आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी जिल्हाधिकारी श्री कुंभेजकर पुढे बोलतांना म्हणाले की, महिला बचत गटांच्या पाठीशी जिल्हा प्रशासन खंबीरपणे उभे आहे. महिलांच्या उद्यमशीलतेला चालना देण्यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यात येईल. कार्यक्रमाचे प्रास्ताविक उमेद महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानाचे जिल्हा अभियान व्यवस्थापक सुधीर खुजे यांनी केले. त्यांनी प्रदर्शनाची रूपरेषा, उद्दिष्टे व महिला बचत गटांसाठी असलेल्या संधींची सविस्तर माहिती दिली. आ. किरणराव सरनाईक यांनी आपल्या मनोगतात जिल्ह्यातून जास्तीत जास्त महिला उद्योजिका घडाव्यात, यासाठी अशा प्रदर्शनांचे महत्त्व अधोरेखित केले. तर आ. श्याम खोडे यांनी सांगितले की, शासनाच्या विविध योजना महिलांसाठी उपलब्ध आहेत. महिला बचत गटांसाठी जिल्ह्यात चांगले काम सुरू असून महिलांचा सर्वांगिण विकास झाला तरच देश खऱ्या अर्थाने आत्मनिर्भर बनेल. जिल्ह्यात बचत गटांचे 'उमेद मॉल' उभारण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात येईल. उपस्थित मान्यवरांनी प्रदर्शनातील विविध स्टॉलना भेट देऊन महिला बचत गटांच्या सदस्यांशी संवाद साधला व त्यांच्या उत्पादनांचे कौतुक केले. प्रदर्शनात जिल्ह्यातील विविध महिला बचत गटांनी तयार केलेली अन्नपदार्थ, हस्तकला, गृहउपयोगी वस्तू, सजावटीच्या वस्तू आदी उत्पादनांची मांडणी करण्यात आली आहे. कार्यक्रमाचे संचालन उमेश आगरकर यांनी केले तर आभार अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी किरण कोवे यांनी मानले. त्यांनी जास्तीत जास्त नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन महिला बचत गटांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन केले. शेवटी मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाच्या जनजागृतीची चित्रफीत उपस्थितांना दाखविण्यात आली. प्रदर्शनात महिला बचत गटांच्या सदस्यांसह उमेद अभियानाच्या संपूर्ण टीमसह अधिकारी कर्मचारी व नागरिकांची उपस्थिती होती.

# खतनापुर - इमामपूर - कामरगाव रस्त्याचे काम करण्यात यावे - विलास राऊत

• सिटी न्युज ब्युरो @ वाशीम •



कारंजा- कारंजा (लाड) ते खतनापुर-इमामपूर -बांबर्डा- कामरगाव ता.कारंजा, जि.वाशिम शेत रस्त्याचे बांधकाम प्रस्तावित करणे बाबतचे पीपल्स रिपब्लिकन पार्टी कारंजा तालुक्याच्या वतीने वाशिम जिल्हा संपर्कप्रमुख तथा कारंजा तालुका अध्यक्ष विलास राऊत यांच्या नेतृत्वात कारंजा-मानोरा विधानसभा क्षेत्राच्या लोकप्रिय आमदार सईताई डहाके यांना निवेदन देण्यात आले.

याबाबतचे सविस्तर वृत्त असे की कारंजा (लाड)- खतनापुर-इमामपूर बाबर्डा-काममरगाव रस्ता हा फार पूर्वीपासून अस्तित्वात होता व आहे या रस्त्याने परिसरातील हजारो शेतकऱ्यांना त्यांचा शेतमाल, बी-बियाणे ने-आन करण्याकरिता, विद्यार्थ्यांना शिक्षण घेण्याकरिता, तसेच परिसरातील ग्रामवासियांना ये-जा करण्याकरिता अत्यंत जवळचा व सोयीचा रस्ता आहे. परंतु आज रोजी सदर रस्त्याची देखभाल व दुरुस्ती न केल्यामुळे रस्ता अत्यंत खराब झाला असून रस्त्यावर मोठे मोठे खड्डे पडलेले आहे. त्यामुळे पावसाळ्यामध्ये रस्त्यावर पावसाचे पाणी साचून चिखल होऊन शेतकऱ्यांची बैलगाडी व ट्रॅक्टर चिखलामध्ये फसतात. त्यामुळे शेतकऱ्यांना पेरणीसाठी बी-बियाणे आणणे, शेतातील शेतमालाची ने-आण करण्याकरिता कास्तकारांना अत्यंत त्रास होतो, तथा ग्रामवासी व विद्यार्थ्यांना येजा करण्याकरिता सुद्धा अत्यंत त्रास सहन करावा लागतो तथा या ठिकाणी अपघात होऊन जीवित्व वित्तहानी होण्याची शक्यता सुद्धा नाकारता येत नाही. अंदाजे ५० पेक्षा जास्त खेडे गावातील हजारो शेतकरी, विद्यार्थी व ग्रामवासीयांच्या कारंजा बाजारपेठे असल्यामुळे त्यांना ये-जा करण्याकरिता सोयीचा होण्याच्या दृष्टिकोनातून सदर रस्त्याच्या बांधकामाचे अंदाजपत्रक सादर करणेबाबत संबंधित विभागात आदेश देऊन सदर कामास निधी उपलब्ध करून देऊन रस्त्याचे बांधकाम करण्यात यावे जेणेकरून परिसरातील हजारो शेतकऱ्यांना, ग्रामवासी विद्यार्थ्यांना न्याय मिळेल. निवेदन करतेवेळी पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे वाशिम जिल्हा संपर्कप्रमुख तथा कारंजा तालुका अध्यक्ष विलास राऊत, अखिल भारतीय मराठा महासंघाचे वाशिम जिल्हा सचिव विजय गागरे, गवळी समाज संघटनेचे माजी वाशिम जिल्हा उपाध्यक्ष चांदभाई मुन्नीवाले यांच्या उपस्थितीत बहुसंख्य शेतकऱ्यांच्या स्वाक्षरी चे निवेदन सादर करण्यात आले.

